वर्ष ४५
अंक २

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

फेब्रुवारी २०२५
माघ/फाल्गुन
शके १९४६

नमस्कार मंडळी,

आज एक फेब्रुवारी, गणेश जयंतीचा दिवस. सर्व गणेश भक्तांना गणेश जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा.

फेब्रुवारी महिना म्हटला की मराठी लोकांसाठी काही महत्त्वाचे दिवस आहेत: पहिला म्हणजे हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या छत्रपती श्री शिवाजी महाराजांची तारखेप्रमाणे जयंती (१९ फेब्रुवारी), त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी (२६ फेब्रुवारी), आणि मराठी भाषा गौरव दिन (२७ फेब्रुवारी). हल्ली बरीच मंडळे शिवजयंती साजरी करतात - जर एखादे मंडळ शिवजयंती साजरी करत नसेल, तर मी त्या मंडळांना आवाहन करतो की त्यांनी या वर्षापासून त्यांच्या मंडळांमध्ये ही नवी प्रथा सुरु करावी.

मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' मिळाल्यानंतरचा हा पहिलाच 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा होणार आहे. मला खात्री आहे की आपल्या सर्व मराठी शाळांमध्ये हा दिवस उत्साहात साजरा होईल. मराठी भाषेची महती नवीन पिढीतील मुलांना समजावून सांगण्यासाठी यापेक्षा दुसरा चांगला मुहूर्त तो कोणता? शक्य असल्यास आपल्या मुलांशी मराठीत बोला, त्यांना तुमच्या बरोबर मराठी बोलायला प्रवृत्त करा, तसेच दोन भावंडांमध्ये मराठी संवाद होईल याची काळजी घ्या. असे केले तरच मराठी भाषा या भूमीवर तग धरेल, नाहीतर मराठीची पीछेहाट होण्यास फार वेळ लागणार नाही.
योगायोगाचा भाग म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे 'प्रौढ मराठी'चा वर्ग या महिन्यातच सुरू होत आहे. जर लहानपणी तुमची मुले मराठी शाळेत गेली नसतील आणि त्यांना आता मराठी भाषा शिकावीशी वाटत असेल तर त्यांना प्रोत्साहन द्या आणि आपली मराठी भाषा आणि संस्कृती या भूमीत जतन करायला मदत करा.

अधिवेशनाच्या बाबतीत बोलायचे झाले तर सिॲटल अधिवेशनाचे 'बोधचिन्ह' तसेच 'ब्रीदवाक्य' नुकतेच अनावरण करण्यात आले. सियाटल मंडळाच्या अध्यक्षा, शिल्पा कर्वे यांनी हे बोधचिन्ह साकारले आहे, तर मंडळातील काही मंडळींनी मिळून ब्रीदवाक्य बनवले आहे. Dallas आणि Cleveland येथील मैत्री मेळाव्याची तयारी पण जोरात सुरू आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाला 'विश्व मराठी संमेलनात' सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. हे अधिवेशन पुणे येथे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे. त्यानुसार मी आणि आमच्या कार्यकारिणीतील काही सदस्य, तसेच इतर काही मंडळातील ३० ते ३५ जण अमेरिका आणि कॅनडामधून भारतात जात आहेत. पुढील महिन्याच्या वृत्तात आपण या अधिवेशनाबद्दल जास्त माहिती सादर करू.

गेल्या महिन्यात फिलाडेल्फिया मराठी मंडळाने 'BMM-PMM Indoor Cricket Tournament' जाहीर केली होती. त्यात एकूण दहा संघांनी भाग घेतला होता. त्यातले सात पुरुषांचे, तर तीन महिलांचे संघ होते. फिलाडेल्फिया, मराठी विश्व, सेन्ट्रल पेनसिल्वेनिया, आणि डेलावेर या मंडळांमधून हे सर्व संघ आले होते. या सर्व खेळाडूंना तसेच स्पर्धेच्या संयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी मी आणि माझी पत्नी, निवी, आम्ही फिलाडेल्फियाला गेलो होतो. दोन दिवस अत्यंत चुरशीने आणि खिलाडीवृत्तीने लढल्या गेलेल्या सामन्यात 'सेंट्रल पेनसिल्वेनियाच्या' पुरुषांनी तसेच त्यांच्याच मंडळाच्या महिलांनी आपापल्या गटातील सामने जिंकून विजेतेपदाचे चषक पटकावले. स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व खेळाडूंचे, तसेच स्पर्धेचे व्यवस्थापक तुषार वेदांती, सुचित्रा शिंदे, सचिन प्रभुदेसाई, आणि गौरव पटवर्धन यांचे मनःपूर्वक अभिनंदन!!!



या दौऱ्यात फिलाडेल्फिया आणि आजूबाजूच्या मंडळांमध्ये जाऊन तेथील हितचिंतकांच्या भेटी घेतल्या. फिलाडेल्फिया मंडळाचे अध्यक्ष सचिन प्रभूदेसाई, 'मराठी विश्व' मंडळाचे अध्यक्ष मंदार केळकर, ग्रेटर रिचमंड मंडळाचे अध्यक्ष अमित कोरडे, तसेच या सर्वांच्या समितीतील काही सदस्य आणि मराठी शाळा शिक्षक, या सर्वांची भेट झाली. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीतील आनंद चौथाई, तसेच पुरु ठाकरे आणि वृत्ताच्या शुभदा सावरगावकर यांची भेट झाली, तर क्रिकेट सामन्यांच्या वेळी सेन्ट्रल पेनसिल्वेनिया मंडळाचे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे प्रतिनिधी पार्थ आठवले यांची पण भेट झाली. खराब हवामानामुळे आमच्या परतीच्या विमानाची वेळ बदलली गेली आणि त्यामुळे 'मराठी कला मंडळ' आणि 'बाल्टिमोर' मंडळाच्या अध्यक्षांना, तसेच तेथील शिक्षक व पदाधिकाऱ्यांना भेटता आले नाही याबद्दल खंत वाटली.

समाज रंग कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन यांचा अमेरिका दौरा आम्ही आखत आहोत. या दौऱ्यात यजुर्वेंद्र, अमेरिकेतील आठ-दहा शहरांना भेटी घेऊन तेथील मराठी मंडळातील लोकांशी संवाद साधून त्यांच्या 'दीपस्तंभ' या दिव्यांग मुलांची पूर्ण जबाबदारी घेऊन त्यांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी काम करणाऱ्या संस्थेबद्दल माहिती देणार आहेत. जर तुमच्या मंडळामध्ये हा कार्यक्रम झाला, तर नक्की उपस्थित रहा आणि त्यांच्या संस्थेला सढळ हस्ताने मदत करा. जय हिंद - जय महाराष्ट्र!
आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| कनेक्ट मराठीशी | ४ |
| वृत्त ‘प्रतिक्रिया’ | ६ |
| BMM Initiative Highlights | ६ |
| कविता: अनुराग | ७ |
| महाराष्ट्राचा भाग्यविधाता | ८ |
| रसिकांच्या हृदयातील तारा - कुसुमाग्रज | ८ |
| अविस्मरणीय कोस्टा रिका | १० |
| जाहिरात | १२ |
| ताटली... | १३ |
| सहज सुखद सहवास गुरूंचा | १४ |
| नितीन सोनवणे: एक गांधी शांती पदयात्रीचा प्रवास | १५ |
| लॉस एंजेलिस - निधी संकलन | १५ |
| जाहिरात | १६ |
| निशब्द संवाद ... | १७ |
| नाही कशी म्हणू तुला?? (नकाराचे महत्व) | १७ |
| अमेरिकेचा पहिला स्वातंत्र्य सैनिक | १९ |
| परिभाषा | १९ |
| संधी | २२ |
| कविता: प्रेम | २३ |
| बीएमएम फायनान्शियल अवलोकन - २०२४ | २४ |
| MANA Paintings | २६ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिअ‍ॅटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या आणि संक्रातीच्या शुभेच्छा. सिअ‍ॅटलमध्ये होणार असलेल्या २०२६च्या स्नेहसंमेलनाची टीम डिसेंबर महिन्यातील सुट्ट्यांनंतर ताजीतवानी होऊन पुन्हा जोमाने कामाला लागली आहे! नुकत्याच झालेल्या सिअ‍ॅटल महाराष्ट्र मंडळाच्या संक्रांतीच्या कार्यक्रमात स्नेहसंमेलनाचे घोषवाक्य आणि बोधचिन्ह ह्यांचे अनावरण करण्यात आले.

बोधचिह्न आणि घोषवाक्य ठरविण्यासाठी आलेल्या स्पर्धेला संपूर्ण उत्तर अमेरिकेतून अतिशय उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला! आलेल्या प्रवेशिकांमधून स्नेहसंमेलनाच्या संयोजन समितीने श्रीमती शीतल रांगणेकर आणि श्रीमती शिल्पा कर्वे ह्यांच्या बोधचिह्न प्रवेशिकांची तर श्रीमती अश्विनी क्षीरसागर आणि सिअ‍ॅटल महाराष्ट्र मंडळाच्या 'स्लोगन पॅनेल' ह्यांच्या घोषवाक्यांची निवड केली. तर मुख्य संयोजकांनी ह्यांमधून स्नेहसंमेलनाचे अंतिम घोषवाक्य आणि बोधचिह्न निवडले.

श्रीमती शिल्पा कर्वे ह्यांनी तयार केलेल्या बोधचिह्नात भारताबाहेर राहून मराठी जोपासत असलेल्या आपल्या मराठमोळ्या अस्तित्वाला "म" ह्या मुळाक्षराद्वारे प्रातिनिधिक स्वरूपात स्थान देण्यात आले आहे. म... मराठीतला, माझ्या मातीतला, माझ्या माणसातला, मनामनांतला, मायबोलीतला, मौजेतला, मनोरंजनातला, मेजवानीतला आणि मैत्रीतला! अनेक शतकं मोडी लिपीत लिहिल्या गेलेल्या आणि आता देवनागरीत लिहिल्या जात असलेल्या आपल्या अभिजात मायबोलीचा प्रवास ह्या मुळाक्षराच्या आकारातून व्यक्त झाला आहे. त्याबरोबरच मुक्तपणे विहरत आसमंताला भेदणारा भगवा झेंडा आणि छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा ह्यांचे आकृतीबंध आपल्या थोर परंपरेची आठवण करून देतात. आम्हां सर्वांची कर्मभूमी म्हणजे सिअ‍ॅटल् शहर आणि ह्या शहराचं प्रतिक म्हणून इथल्या 'स्पेस निडल'ची रेखाकृती ह्या बोधचिह्नात दिसून येते.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे स्नेहसंमेलन म्हणजे उत्तर अमेरिकेतील मराठीजनांचा आपली संस्कृती जपण्याचा उत्सव! ह्या स्नेहसंमेलनाला अनेक जण वर्षानुवर्षे सातत्याने हजेरी लावत आहेत. ह्या माध्यमातून जुनी नाती जपली जातात, नवीन नाती जोडली जातात. मातृभूमीशी असलेलं आपलं नातंही घट्ट होत जातं. ही मध्यवर्ती संकल्पना दर्शवण्यासाठी आमच्या स्नेहसंमेलनाच्या संयोजन समितीने ठरवलेलं घोषवाक्य आहे **'जपूया संस्कृती, विणूया नाती'!**

आपण बोधचिन्ह तसेच अनावरण कार्यक्रमाची छोटीशी झलक स्नेहसंमेलनाच्या समाजमाध्यमांवर बघू शकता.

फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle

इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattle

पैशाने सगळं विकत घेता येत नाही हे जरी खरं असलं तरी स्नेहसंमेलन आयोजित करायला पैसा हवाच आणि म्हणूनच आमच्या निधी संकलन (Fundraising) समितीचे काम जोरदार सुरु झालेले आहे. संभाव्य देणगीदार आणि प्रायोजकांसाठी आम्ही आकर्षक पॅकेज तयार केलेली आहेत. संक्रांतीच्या कार्यक्रमात त्याबद्दलची घोषणाही करण्यात आली. सांगायला अतिशय आनंद होतो आहे की घोषणा झाल्या झाल्या एका कॉर्पोरेट आणि सुमारे पंधरा वैयक्तिक देणगीदारांनी मिळून ६० हजार डॉलर एवढा निधी देण्याची हमी दिलेली आहे! पॅकेज बद्दलची सर्व माहिती स्नेहसंमेलनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. bmmseattle2026.org/individual-donor-sponsorship-tiers/. सर्व इच्छुक देणगीदारांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधावा. आम्ही तुमच्याबरोबर चर्चा करून तुम्हांला योग्य असे कॉर्पोरेट किंवा वैयक्तिक पॅकेज निवडायला मदत करू.

उत्तर अमेरिकेतल्या तसेच भारतातल्या गुणी कलाकारांच्या सादरीकरणाचा आनंद आपल्याला स्नेहसंमेलनात घेता येतो. कलाकारांना त्यांच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव आमच्यापर्यंत पाठवता यावे ह्यासाठी 'RFP process' आम्ही लवकरच जाहीर करणार आहोत. तसेच तिकीट नोंदणीची सिस्टीम, पाहुण्यांच्या राहण्यासाठी हॉटेल, जेवणखाण च्या व्यवस्थेची जुळवाजुळवी अशी बरीच कामे करण्यात संयोजन समिती व्यग्र आहे. ह्या सगळ्याबद्दलची अधिक माहिती आम्ही पुढच्या वृत्तपत्रांद्वारे आपल्याला देत राहूच. तोपर्यंत अधिवेशनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती समाज माध्यमांतून बघत रहा आणि तुमच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या ईमेल पत्त्यावर संपर्क साधा.

## कनेक्ट मराठीशी
## बृ. म. मंडळाचा ‘बी कनेक्ट’ उपक्रम

बृहन्महाराष्ट्र मंडळ १९८१ साली सुरू झाले. पुढे १९८४ मध्ये झालेल्या बृ. म. मं. च्या अधिवेशनात ‘व्यवसाय’ या विषयावरील पहिले सत्र पार पडले. १९८१ च्या सुमारास शिकागोच्या विष्णू वैद्य, बृ. म. मं. संस्थापक, यांची ही संकल्पना होती. या अधिवेशनात खाण आणि कापड उद्यमातील प्रसिद्ध उद्योगपती रावसाहेब गोगटे यांना बोलवण्यात आले होते. हे होते व्यवसायाच्या मार्गदर्शनासाठीचे पहिले पाऊल... हीच होती ‘बी कनेक्ट’ या उपकमाची चाहूल.

**यशस्वी प्रदर्शनापर्यंत भरारी:** ‘बी कनेक्ट’चे सध्याचे संचालक आनंद चौथाई यांच्या मते, मोहन रानडे यांनी १९९१ मध्ये भरलेल्या अधिवेशनात औपचारिकरित्या व्यावसायिक परिषदेचे आयोजन केले. त्यानंतर २००७ मधे अटलांटा येथे भरलेल्या अधिवेशनात डॉ. रघुनाथ माशेलकर आणि सुनील गावसकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्या वेळेस पहिल्यांदा एक दिवसीय व्यावसायिक परिषद आयोजित केली गेली होती. फिलाडेल्फियात २००९ मध्ये झालेल्या अधिवेशनात व्यवयाय या विषयासंबंधित पहिले यशस्वी प्रदर्शन भरले. ही यशस्वी भरारी मारताना व्यवसाय जगतात, ओळखी वाढवण्याचा उद्देश कायमच डोळ्यासमोर होता. यानंतर बृ. म. मं. च्या दर अधिवेशनाच्या आदल्या दिवशी व्यावसायिक परिषदेचे आयोजन सुरु झाले.

**महिला सबलीकरण आणि ओप्युलंट शार्कः** (‘Women Empowerment and Opulent Sharks’) न्यू जर्सी येथील २०२२ साली भरलेल्या अधिवेशनामध्ये आयोजित करण्यात आलेली एक दिवसीय व्यावसायिक परिषद आपला ठसा उमटवून गेली. यामध्ये महिला सबलीकरणावर भर दिला गेला. त्याचप्रमाणे ‘शार्क टॅंक’वर आधारित ‘ओप्युलंट शार्क’ या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. हा उपक्रम फक्त अधिवेशनापुरता मर्यादित न राहता सलग चालू राहावा, अशा विचारानेच यावर्षी परिषदेतील कार्यक्रमांचे आयोजन केले होते. हीच खरी होती ‘बी कनेक्ट’ची सुरवात.

**मराठी माणसं आणि व्यवसाय:** ‘बी कनेक्ट’चे पूर्व संचालक विराज राऊत यांनी सांगितले की, “अनेकांना असं वाटतं की मराठी माणूस व्यवसाय करू शकत नाही. पण किर्लोस्करांपासून ते चितळे बंधुंपर्यंत अनेक यशस्वी व्यावसायिक मराठी आहेत. मराठी माणूस व्यवसाय करू शकत नाही, हा साचा बदलायचा होता. दर अधिवेशनात होणारी एक दिवसीय परिषद हा ‘बी कनेक्ट’ चा पाया नक्कीच होता. पण व्यवसाय मार्गदर्शन आणि त्यासाठी लागणारी मदत  दोन्ही गोष्टी सलग चालू राहण्याची गरज जाणवत होती आणि त्यासाठीच २०२२ साली ‘बी कनेक्ट’ ची अधिकृत सुरुवात झाली. या उपक्रमांतर्गत आम्ही समाजाला नक्की कशाची गरज आहे, त्या गोष्टींचा समावेश करणाचा प्रयत्न केला. रेशीमगाठी आणि उत्तररंग हे बृ. म. मं. चे दोन उपक्रम यशस्वी झाल्यानंतर आत्मविश्वास वाढला होताच. अगदी छोटा व्यवसाय सुरू करतानासुद्धा अनेक गोष्टींची गरज भासू शकते. त्यात इतरांशी संवाद साधण्याची गरज पडते. अशा विषयांवर मार्गदर्शन उपलब्ध करण्याचा प्रयत्न आम्ही केला. मराठी समाजातही अनेक डॉक्टर, वकील आणि उद्योजक आहेत. विशेष म्हणजे त्यांनाही आजच्या युवा वर्गाला मार्गदर्शन करण्याची इच्छा आहे. आम्ही फक्त आयटी सेक्टरचा विचार न करता डे-केअर पासून केटरिंग पर्यंत सगळ्या व्यवसायांचा विचार केला.”

**व्यवसाय आणि नोकरीचे परिपूर्ण मार्गदर्शन:** ‘बी कनेक्ट’ उपक्रमांतर्गत कुठला व्यवसाय करायचा, कसा सुरू करायचा, त्यासाठी काय करावे लागेल, तो व्यवस्थित चालण्यासाठी काय पावले उचलावीत, त्यातील फायदे, तोटे आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ तसेच आर्थिक नियोजन या सगळ्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. अजून एक पाऊल पुढे उचलत ‘बी कनेक्ट’ने रिक्रुटमेंट हा विषय हाताळायला सुरवात केली आहे. अभिजीत जोशी यांच्या पुढाकाराने नोकरी कोणाला हवी आहे, कोणाकडे माणसांची गरज आहे, इंटर्नशिप असे सगळे विषय हाताळले जात आहेत. यासाठी व्हॉट्सअप ग्रुप तयार केले गेले आहेत. एका वर्षातच दोनशेहून अधिक लोकांना याचा फायदा झाला आहे. यावरून या विषयाची असलेली गरज लक्षात येते.

**पुढचे ध्येय:** विराज यांच्या मते, २०२३ साली वॉशिंग्टन आणि सिएटलमध्ये दोन मैत्री मेळावे झाले. त्यामधून असे लक्षात आले, की सॉफ्टवेअर बनवणे, आर्ट ते केक डिस्ट्रिब्युशनपर्यंत सगळ्या प्रकारचे व्यवसाय लोक करत आहेत. नावाजलेल्या कंपन्यांमध्ये नोकरी करतानाच स्वतः समुपदेशन करणारे तज्ञदेखील आहेत. त्यांचे मार्गदर्शन गरजूंना मिळावे म्हणून ‘बी कनेक्ट’ चे कार्यकर्ते प्रयत्न करत आहेत.

**उत्तम सामूहिक कार्य:** बृ. म. मं. च्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होणाऱ्या व्यावसायिक परिषदेची जबाबदारी ‘बी कनेक्ट’ ने घेतली आहे. ‘बी कनेक्ट’ कडे उत्तम नेतृत्व आहे तसेच, बावीसहून अधिक स्वयंसेवक आहेत. ते वेगवेगळ्या स्तरावर काम करून ‘बी कनेक्ट’ ला पुढे नेत आहेत.

**स्वरूप:** ‘बी कनेक्ट’चे सध्याचे संचालक आनंद चौथाई यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

‘बी कनेक्ट’ दर महिन्याला दोन सत्रे आयोजित करण्याचा प्रयत्न करत आहे. पहिल्या सत्रात व्यवसायाच्या स्वरूपावर (Anatomy of a business ) मार्गदर्शन केले जाईल. व्यवसाय सुरू करण्यापासून यशस्वी होईपर्यंत कशाकशातून जावे लागते याबाबतची माहिती यशस्वी लोकांकडून देण्याचा प्रयत्न आहे. तर दुसऱ्या सत्रात छोटे व्यवसाय आणि career guidance यांच्यावर भर दिला जाईल.

आत्तापर्यंत झालेल्या सत्रांमध्ये सुधीर कदम (व्हेंचर बिल्डिंग, बिझनेस इनोव्हेशन आणि स्टार्टअप बोर्ड मधील एक सुप्रसिद्ध उद्योजक आणि सल्लागार - ज्यांचा उच्च-प्रभावी कंपन्यांची स्थापना आणि वाढीकडे नेण्याचा ट्रॅक रेकॉर्ड आहे.) यांनी ‘स्टार्टअप’ विषयी मार्गदर्शन केले. स्टील व्यावसायिक सुदर्शन साठे (ज्यांनी मिळवलेले अनेक पेटंट्स आज उत्तर अमेरिकेतील स्टील उद्योगात वापरले जातात) यांनी व्यवसायासाठी लागणाऱ्या जिद्दीबाबत मार्गदर्शन केले. तसेच, मोहन रानडे (नीलम FAB चे मालक आणि बृ. म. मं. अध्यक्ष १९९१-१९९३) यांनी छोट्या व्यवसायाशी संबंधित मार्गदर्शन केले. समीर लिमये यांनी दासबोधावर आधारित ‘कॉर्पोरेट कीर्तन’ हा आगळावेगळा कार्यक्रम सादर केला. यामध्ये त्यांनी दासबोधाचा व्यवसायात कसा उपयोग करून घेता येईल, या विषयी मार्गदर्शन केले. अनेक महिलांचा काही ना काही कारणाने करिअरमध्ये ब्रेक होतो. अशांना परत सुरवात कशी करता येईल याबाबत स्वाती व्होरा यांनी मार्गदर्शन केले.

गुंतवणूक करण्यासाठी रिअल इस्टेटविषयी सत्र सुरू केले आहे तसेच Franchise क्षेत्रात असलेल्या व्यावसायिकांसाठीही वेगळे सत्र आयोजित केले जात आहे. आपल्या व्यवसायाला प्रमोट कसं करायचं, हा एक महत्त्वाचा मुद्दा असतो. त्यासाठी ‘बी कनेक्ट’ चे नरेंद्र पाटील प्रयत्नशील आहेत.

**युवा पिढीसाठी मोलाचे कार्य:** भारतातून शिकण्यासाठी आलेल्या किंवा इथे स्थायिक असलेल्या मराठी विद्यार्थ्यांना नोकरी आणि इंटर्नशिप मिळणे हे मोठे आव्हान आहे. त्यांच्यासाठी एक वेबसाईट तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यामध्ये अशा इंटर्नशिप किंवा नोकऱ्यांच्या माहिती बरोबरच आजकाल सगळीकडे लागणारे रेफेरेंन्सेसही उपलब्ध करून देण्यावर भर असेल.

‘बी कनेक्ट’ अमेरिकन विद्यार्थ्यांसाठी एक अनोखा उपक्रम आखत आहे. यामध्ये आपल्या मराठी विद्यार्थ्यांना भारतामध्ये दोन महिने इंटर्नशिप करण्याची संधी मिळणार आहे. या वर्षी वीस विद्यार्थ्यांना अशी इंटर्निशप मिळवण्याचे ध्येय ठेवले आहे. याबरोबरच संस्कृतीची ओळख करून देण्याचा आणि बदललेला भारत दाखवण्याच्या उद्देशाने एखाद्या सहलीचे आयोजन सुद्धा करण्यात येणार आहे.

**पुढील वाटचाल:** ‘बी कनेक्ट’चे लक्ष्य अधिक शाखा (चॅप्टर्स) सुरू करणे हे आहे. या वर्षी होणाऱ्या दोन मैत्री मेळाव्यांमध्ये ‘बी कनेक्ट’चा प्रामुख्याने सहभाग राहील. ‘बी कनेक्ट’ला एक ब्रँड म्हणून स्थापित करण्याचा प्रयत्न हिरीरीने सुरु आहे.

अमेरिकेतील व्यावसायिकांसाठी आणि उद्योजकांसाठी ‘बी कनेक्ट’ सतत कार्यरत आहे. त्यांना अनेकोत्तम शुभेच्छा!

Follow LinkedIn page here [www.linkedin.com/company/bconnectbybmm](www.linkedin.com/company/bconnectbybmm)

Join BConnect here: [https://bmm2.page.link/bconnect](https://bmm2.page.link/bconnect)

- **अदिती खिस्ती-बेलसरे,** मँटीका, कॅलिफोर्निया



## वृत्त ‘प्रतिक्रिया’

माननीय वृत्त समिती,
‘या वर्षी तरी मिळवणारच !’ हा लेख वाचायला लागल्याबरोबर जो चेहरा हसरा झाला, तो लेख संपता संपता अगदी हसुन हसुन लाल झाला. पुन्हा एकदा कॉलेज च्या दिवसात केलेल्या संकल्पाची यादी आठवली. टिळक आणि शिवाजी राज्यांशी तुलना - किती मजेशीर! आणि राजेश खन्ना व ऋषी कपूर च्या गाण्यामुळे तर कट्यार एकदम काळजातच घुसली! कुठेतरी ही विनोदी सत्यकथा हे सांगून गेली की पाय अडखळला तरी चालणे सोडायचे नाही. प्रयत्न करत राहावा, आणि आपण पडलोच तर धड पडावे. नवीन वर्षाची सुरुवात विनोदी केल्याबद्दल ‘सुdhir’ सुधीर धर्माधिकारी) व ‘वृत्ताचे’ चे मनापासून धन्यवाद!

एक वृत्त प्रशंसक

---

वृत्त समितीस नमस्कार,
AI वर लिहिलेला लेख वाचून अवाक झाले. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, आरोग्य आणि औषधशास्त्र, targeted pesticide, पर्यावरणशास्त्र, प्रत्येक विषयात AI chya आधाराने किती प्रगती झाली आणि पुढेही होत राहणार! ह्या लेखात थोडक्यात माहिती दिली असली तरी ती वाचून अधिक माहिती साठी गुगल वर जाऊन प्रत्येक गोष्टीचा अधिक खुलासा केला. पण ह्या पहिल्या exposure मुळेच तसे करावेसे वाटले. इतकी वैज्ञानिक माहिती BMM च्या वृत्तात मिळावी हे अगदी कौतुकास्पद आहे.

निनावी वाचक

---

To president, treasurer, Vrutta
This digital Vrutta is a great (Green) initiative. Audio format for articles is a brilliant idea.
Reading the Vrutta is always an enriching experience.
Thanks to your entire team.

Regards. Nitin Vidwans

---

शिल्पा कुलकर्णी यांचा “अमूर्त” लेख खूप आवडला, अमूर्ततेची खूप सुंदर उदाहरणं दिलेली आहेत! बीज, कुंभाराची माती, संगीतकार, गीतकार, ग्रंथ सर्वच..

Sudhir Dharmadhikari

## BMM Initiative Highlights

- **उत्तरंग: उत्तरंगने जानेवारीत दोन सत्रे केली.**

१. **Regulatory compliance and reporting of foreign financial assets, income, gifts and inheritance.** सर्व वयोगटातील सदस्यांना महत्वाचा वाटणारा विषय श्री. मनोहर डागा यांनी अतिशय कौशल्याने हाताळला. त्यांच्या ह्या ज्ञानाचा फायदा जवळ जवळ २०० प्रेक्षकांनी घेतला. लोकआग्रहामुळे हे सत्र record केले असून लवकरच ते परत दाखवले जाईल.

२. **स्वतंत्रते भगवती** : भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री. कांचन कुलकर्णी ह्यानी देशभक्त वीर सावरकर ह्यांच्या आयुष्यावर कार्यक्रम सादर केला. त्याची ओघवती वाणी, शब्दसंपदा, सावरकरांवर असलेली भक्ती आणी विषयाचे गाढे ज्ञान हयामुळे त्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

- **Community Outreach :**

**Classical Music Program:** Successfully conducted a free introductory session on classical music, a collaborative effort between BMM and the Mahesh Kale School of Music.

**Astrology Initiative:** Marking a new milestone, the first batch of the BMM Astrology program commenced on the auspicious Republic Day, January 26, 2025.

- **Sports :**

**BMM-PMM Indoor Cricket Tournament:** Hosted by the Philadelphia Marathi Mandal, this two-day East Coast regional indoor cricket tournament brought together 10 teams representing four participating Maharashtra mandals:
१. Philadelphia Marathi Mandal (Host)
२. Central Pennsylvania Marathi Mandal
३. Marathi Vishwa, New Jersey
४. Delaware Valley Marathi Mandal
Congratulations to the Central Pennsylvania Marathi Mandal for winning both the men's and women's cricket tournament championships.

- **BMM INDIA Programming :** After successful Fulwanti shows , we have done 7 shows of 'Bombilwadi' movie. Currently 'First Class Dabhade' movie also going on

We have big line up coming for India programming

**April - May :** Dhanashree Lele,

Jar Tar Chi Gost (Dallas BMM mini marathi Melawa Specail)

**June** : Salil Kulkarni Music tour (Cleveland Marathi Melawa Specail )

**October** : Prashant Damle coming with

'Shikayala Gelo Ek'

- **Shala:** BMM Shala received sarav pariksha/ Chachani pariksha papers along with answer model and rubric, from Maharashtra State Board. BalBharati sarav pariksha papers have been distributed to BMM Shala coordinators. BMM Shala students will get International Saral student ID from Bal Bharti.

- **Bconnect:** Bconnect 2025 started with a talk with Mr. Mohan Ranade on Combining Tradition & Innovation to start your own small business, it was well received by the audience. In the continuing series 'Anatomy of a Startup' Dr. Sanjay Bhandari spoke "For startups, safeguarding intellectual property (IP) is vital for staying competitive and appealing to investors." It was an interactive session.

- **समाजरंग** (social initiative)**:** "हात देऊ मदतीचे | सेतू बांधू अंतरीचे ||

जुळवू नाते मनांचे | स्वप्न पाहू सुपंथाचे||"

समाजरंग या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती डिसेंबरच्या अंकात दिली आहे. हा उपक्रम आता चांगलीच प्रगती करू लागला आहे. गेल्या महिन्यापासून आपले सात स्वयंसेवक मराठी मंडळांना या उपक्रमाचे महत्व समजावून सांगत आहेत. प्रत्येक मराठी मंडळाने वर्षभरात काही ना काही निधी विशेषतः: महाराष्ट्रातील सामाजिक उपक्रमांना द्यावा हे या चर्चेमागचे सूत्र आहे. त्यासाठी कामाची निवड करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ मदत करेल. आतापर्यंत चार पाच मराठी मंडळांनी सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. दोन मराठी मंडळांनी निधिसंकलनाचे उपक्रम करून हे काम सुरु केले आहे. महाराष्ट्रातील काही सामाजिक उपक्रमांना प्रत्यक्ष भेट देऊन मी त्यांचे काम समजावून घेतले. काही प्रतिनिधी अमेरिकेत दौरे करून या कामांचा परिचय मराठी लोकांना करून देणार आहेत. पुढील अंकात उपक्रम आणि दौरे याबद्दल माहिती देऊ.

## अनुराग

तुझ्यासमोर भासते तुलाच मी क्षणोक्षणी
तू श्वास घे सुगंध धुंद स्वार मी मनोमनी
उगाच का पुन्हा पुन्हा मी स्वप्न वाटते तुला
कि हेच का ते प्रेम रे जे स्पर्शिले तुला मला

तू वाचतोस काव्यसंच काय त्यात वर्णिले
नि कल्पनेतल्या मला खरे कवेत घेतले
प्रिया तुझी तुझ्या समोर लाजुनी शहारता
कि हेच का ते प्रेम रे जे स्पर्शते तुला मला

तुझा कटाक्ष एक जाणिवेतुनी मी मोहले
तुझ्यात रे विलीन होत चांदण्यात न्हाहले
असा कुठे कुठे सुखे गवाक्षी चंद्र लोपला
स्पर्शिले जे प्रेम ते तू हेच का दिले मला

धुक्यात चालता तुझा परोक्ष हात ग्राह्यते
तुझी छबी मनात ठेवूनि मी मुग्ध डोलते
सुखावते खुणावते तुला सख्या न पाहता
स्पर्शिले मनास तू नि रोम रोम बहरला

- **प्रिया गोडबोले,** एडिसन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## महाराष्ट्राचा भाग्यविधाता

**हे हिंदुशक्ति संभूत दीप्तितम तेजा**
**हे हिंदुतपस्या पूत ईश्वरी ओजा**
**हे हिंदुश्री सौभाग्य भूतीच्या साजा**
**हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा**

या तेजस्वी शब्दांत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्यांचे वर्णन केले आहे ते म्हणजे आपले सर्वांचे लाडके छत्रपती श्री शिवाजी राजे.

महाराष्ट्राचे आराध्यदैवत कोण असा प्रश्न विचारल्यावर जी मोजकी नावे पुढे येतील त्यात महाराजांचे नाव अर्थातच अग्रभागी येते. अत्यंत झुंजार, पराक्रमी आणि रणनीति निपुण असा हा मराठ्यांचा राजा !

त्यांचे सारे चरित्रच अद्भुत अशा घटनांनी भरलेले आहे. वयाच्या केवळ १६ व्या वर्षी त्यांनी पहिला किल्ला - 'तोरणा' जिंकला आणि त्यानंतर कधीच मागे वळून पाहिले नाही. गनिमी काव्याने मोगलांच्या सैन्याला नामोहरम करीत त्यांची विजयी वाटचाल सतत सुरू राहिली.

शिवाजी महाराजांच्या सर्व गुणांचे वर्णन करायचे म्हटले तर तो एका मोठ्या कादंबरीचा विषय होईल.

त्या काळी मोगली राज्यात स्त्रिया कायम असुरक्षित होत्या. खुद्द जिजाऊंच्या जाऊबाई पाणी भरायला गेल्या असताना त्यांना महाबतखान नावाच्या मोगल सरदाराने पळवून नेले होते.

शत्रूच्या या जुलमी पार्श्वभूमीवर स्त्रियांबद्दलचा आदर हा गुण राजांच्या चरित्रात प्रकर्षाने दिसून येतो. खालील उदाहरणे त्याची साक्ष पटवतात.

रांझे गावचा पाटील हा अत्यंत मगरूर होता. पाटीलकी खरं तर प्रजेच्या रक्षणासाठी दिली जात असे. पण या पाटलाने गावातील एक मुलगी पाणवठ्यावर गेली असताना तिचा विनयभंग केला. त्या धक्क्याने त्या मुलीने आत्महत्या केली. मुलीच्या वडिलांनी राजांकडे फिर्याद नोंदवली. पाटलाचा गुन्हा सिद्ध होताच राजांनी भर दरबारात त्याचे हात नि पाय तोडायची शिक्षा दिली होती. या प्रसंगी राजांचे वय अगदीच कोवळे होते. पण त्या वयातही अन्यायाविरुद्ध खंबीर पावले उचलून अपराध्याला जरब बसेल असा निर्णय घेण्याची क्षमता राजेंमधे होती.

दुसऱ्या एका प्रसंगात बेलवडी गावच्या गढीतील पाटलीण सावित्रीबाई आणि राजांचे सरदार सखुजीराव गायकवाड यांची लढाई झाली. अथक प्रयत्न करूनही गढी काबीज होत नव्हती. सावित्रीबाई अत्यंत शूर होत्या. पण शेवटी त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यांना कैद केल्यावर सखुजीरावांनी त्यांच्याशी गैरवर्तन केले. महाराजांना ही बातमी कळताच त्यांनी सखुजीरावांचे हात व पाय कलम करण्याची शिक्षा ठोठावली होती. या बाबतीत ते आपल्या सरदारांनाही दयामाया दाखवत नसत.

आणि शेवटी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची कथा तर सर्वश्रुतच आहे. अत्यंत सौंदर्यवती अशी शत्रूची स्त्री हातात सापडली असताना सुद्धा तिचा सन्मान करून, चोळीबांगडी करून त्यांनी तिला परत पाठवले होते. "आमच्या माँ साहेब इतक्या सुंदर असत्या तर आम्हीही सुंदर झालो असतो." हे त्यांचे वाक्य इतिहासात अजरामर झाले आहे.

या अतुलनीय योद्ध्याची आणि न्यायी राजाची या महिन्यात जयंती साजरी केली जाते. त्यांच्या पावन स्मृतीस त्रिवार अभिवादन!

**- मधुरिमा डबली**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## रसिकांच्या हृदयातील तारा - कुसुमाग्रज

रसिकहो, कविकुलगुरू कालिदासाच्या बाबतीत एक सुभाषित सर्वश्रुत आणि सुप्रसिद्ध आहे

**पुरा कवीनां गणना प्रसंगे, कनिष्ठिकाधिष्ठित कालिदास: !**
**अद्यापि तत्तुल्यकवेर्भावात् अनामिका सार्थवती बभूव !!**

म्हणजे, पूर्वी एकदा उत्तम कवींची गणना करण्याच्या प्रसंगी कवी कालिदासाचं नाव कनिष्ठिकेवर म्हणजे करंगळीवरती प्रथम क्रमांकाने घेतलं गेलं. पण अद्यापही, त्याच्या तोडीचा कवी न सापडल्याने, त्या करंगळी शेजारच्या बोटाचं 'अनामिका', हे नाव सार्थ ठरलं.

परंतु अनेक शतकांनंतर विसाव्या शतकांत त्या अनामिकेवर नाव घेण्यासारखा, उत्तुंग प्रतिभाशक्तीचा कवी अवतरला, आणि तोही महाराष्ट्रभूमीत! असा एक तारा मराठी भाषेच्या तारांगणात चमकला आणि आजही चमकतोय. हे मराठी साहित्य विश्वाचं भाग्यच ! आणि हे सारं समजण्यासाठी आपल्याला मराठी मातीत आणि मराठी भाषेच्या कुशीत जन्म मिळाला, हे आपलं साऱ्यांचं भाग्य !

ज्यांच्या हातून वैश्विक वाङ्मयाची निर्मिती झाली असे एक महान कवी, नाटककार, साहित्यिक, विचारवंत, तत्वज्ञ आणि सच्चे समाजसेवक. एक वंदनीय आणि ऋषीतुल्य व्यक्तिमत्व! 'कवीनां कवी' किंवा 'कवी कुलगुरू' म्हणून ओळखले जाणारे कवी कुसुमाग्रज ! ज्यांच्यामुळे मराठीला दुसऱ्यांदा 'ज्ञानपीठ' हा भारतीय भाषांमधील सर्वोच्च साहित्य सन्मान लाभला ते कवी कुसुमाग्रज!

२७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस. महाराष्ट्र आणि गोवा राज्यांमध्ये तो 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून मोठ्या दिमाखाने साजरा केला जातो.

आपल्या कवितेविषयी सांगताना कुसुमाग्रज म्हणतात; मी जाणीवपूर्वक 'कुसुमाग्रज म्हणतात' असं म्हटलं, 'म्हणाले होते' असं नाही. कारण ज्यांनी शाश्वत, चिरंतन अशी अक्षरनिर्मिती केली त्यांच्या बाबतीत 'भूतकाळ' संभवतच नाही. जसं - ज्ञानेश्वर म्हणतात, तुकाराम म्हणतात, तसंच कुसुमाग्रज म्हणतात - आपल्या स्वतःच्या कवितेविषयी -

**दूरस्थ कुणी दे तुझ्या करी ही कविता**
**वाहते जिच्यातून त्याची जीवन सरिता**
**खळखळे अडखळे सुके कधी फेसाळे**
**परी अखंड शोधे वाट समुद्राकरिता**

तसं पाहिलं तर कुसुमाग्रजांची कविता ही नदीसारखीच आहे. सागराकडे जाणारी नदी ज्याप्रमाणे जाता जाता आजूबाजूचा प्रदेश समृद्ध करीत जाते, अगदी त्याप्रमाणे कुसुमाग्रजांच्या कविता, त्यांचं साहित्य आपलं जीवनसुद्धा चांगल्या विचारांनी समृद्ध करत जातात.

कुसुमाग्रजांच्या साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात असलेली भावनांची उत्कटता, शब्दांची जादू, आणि विचारांची गहनता. त्यांच्या काव्यात निसर्ग, प्रेम, आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन होते. कथांमधून मानवी मनोवृत्तीची गूढता आणि सच्चेपणा उलगडतो. नाटकांतून मानवी स्वभावाचे नाट्यमय दर्शन आणि सामाजिक वास्तवाची झलक दिसते. 'केवळ रंजनासाठी' हा कुसुमाग्रजांच्या कलेचा वा कलाकृतीचा हेतू कधीच नव्हता. आणि म्हणूनच ते म्हणतात

**विजयासाठी माझी कविता कधीच नव्हती**
**म्हणून नव्हती भीती तिजला पराजयाची**
**जन्मासाठी हटून केव्हा नव्हती बसली**
**म्हणून नाही खंतही तिजला मरावयाची.**

२०२२ साली अटलांटिक सिटी, न्यूजर्सी येथील बृहन महाराष्ट्र मंडळ अधिवेशनात आम्ही 'रसिकांच्या हृदयातील तारा' हा कुसुमाग्रजांवर आधारित कार्यक्रम सादर केला होता. तेव्हा कुसुमाग्रजांना अभिवंदन करण्यासाठी व त्यांच्या कार्याला अर्पण केलेली ही नांदी:

**शब्दसुमंता प्रज्ञावंता सरस्वती लेकरा**
**इथे प्रकटूनि मन गाभारा तव शब्दांनी भरा ||**
**मनामनांच्या जाणिवांना जागविसी अंतरी**
**तुझी लेखणी कोरत जाई लेणी हृदयावरी**
**सुगंध पखरण करी जीवनी तुझी काव्य कस्तुरी**
**करा कृपेने शब्दांगण हे पावन श्री कविवरा ||**
**नाट्य-काव्य तव साहित्याची गंगा-गोदावरी**
**मानवतेचे निशाण मिरवी धैर्य पेरिसी उरी**
**धन्य जाहली माय मराठी हिरा जन्मला घरी**
**प्रणाम घ्यावा हे रसिकांच्या हृदयातील तारा ||**
**शब्दसुमंता प्रज्ञावंता सरस्वती लेकरा ||**
**प्रणाम घ्यावा हे रसिकांच्या हृदयातील तारा ||**

- **शीतल डोळस**, कुपरटीनो, कॅलिफोर्निया


ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




**राशिभविष्य : फेब्रुवारी २०२५**
**"वक्री गुरु आणि हर्षल मार्गी होउन बऱ्याच राशींची सुटका करणार "**
**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## अविस्मरणीय कोस्टा रिका

कोस्टा रिका ह्या देशाचं तत्त्वज्ञान दोन शब्दांत वर्णन करायचं झालं तर त्यांच्याच भाषेत - pura vida - म्हणजेच pure life असं करावं लागेल. मराठीत त्याला आपण 'शुद्ध जीवन' किंवा 'साधे राहणीमान' असे म्हणू शकतो. ते किती समर्पक आहे ह्याची प्रचीती आम्ही डिसेंबर २०२४ मध्ये त्या देशाची सहल करून अनुभवली.



सॅन होजे विमानतळावरून आम्ही तडक 'ला फॉर्टुना' ह्या गावी गेलो. जवळपास ३ तासांच्या ह्या प्रवासात सर्वत्र हिरवेगार डोंगर नजरेस पडले. रस्ता खूप वळणावळणाचा होता पण आजूबाजूला छोट्या छोट्या गावांमधूनही छान टुमदार घरं लागली. अत्यंत आकर्षक आणि देखणी. असंख्य प्रकारच्या गर्द झाडांमधून हळूच डोकावणारी.

'ला फॉर्टुना' ह्या गावात आमचं हॉटेल 'आरेनल' ह्या ज्वालामुखीच्या पायथ्याशी होतं. प्रत्येकाचा स्वतंत्र असा छोटा बंगला होता. प्रत्येक बंगल्याच्या सभोवती विविध रंगांची इतकी मनोवेधक झाडं लावली होती की शेजारचा बंगला दृष्टीस पण येत नव्हता. त्या रंगांची उधळण बघूनच आमच्या प्रवासाचा सर्व शीण एका क्षणात पळून गेला.

लगेचच आम्ही ज्वालामुखीच्या गरम पाण्यामुळे तयार झालेले झरे बघायला 'टॅबॅकॉन' ह्या ठिकाणी गेलो. तिथे खूप उंचावरून येणारे झरे विविध ठिकाणी अडवून लोकांना डुंबण्यासाठी छोटी छोटी तळी केली आहेत. प्रचंड जोराने येणाऱ्या त्या गरम पाण्यात डुंबून मन आणि शरीर दोन्ही ताजेतवाने झाले.

दुसऱ्या दिवशी 'आरेनल' ज्वालामुखीच्या समोरच्या एका उंच डोंगरावर स्काय ट्रॅमने पोचलो. नंतर त्या घनदाट जंगलावरून झिपलाइनिंगचा थरारक अनुभव घेतला. ८ वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये १० सेकंदांपासून १ मिनिटापर्यंत प्रचंड वाऱ्याच्या वेगात खाली येताना आजूबाजूच्या निसर्गाचे विलोभनीय दृश्य शक्य तेवढं डोळ्यात साठवून ठेवलं.

तिसऱ्या दिवशी 'आरेनल'च्या 'रेन फॉरेस्ट' मधून टूर गाईडसोबत भटकंती केली. क्षितिजापर्यंत पोचलेले घनदाट वृक्ष, त्यावरून खाली येणाऱ्या वेली, पावसामुळे थबथबलेली जमीन आणि विविध पक्षांचे सुमधुर ध्वनी आम्ही पंचेंद्रियांमध्ये पुरेपूर साठवून घेत होतो. माकडे, साप, सरडे, स्लॉथ, टुकान असे वेगवेगळे प्राणी अतिशय जवळून बघायला मिळाले आणि गाईड देत असलेल्या माहितीबरोबरच आमच्या कॅमेऱ्यात ते सर्व टिपण्यात आम्ही मग्न झालो. आतापर्यंत रेन फॉरेस्टबद्दल नुसते ऐकले होते. पण वर्षातून जवळपास बारा महिने होणाऱ्या पावसामुळे जोमाने वाढलेली झाडे आणि त्यांच्या आधारामुळे बहरलेले प्राणीजीवन अनुभवणे हा एक आल्हाददायी सोहळा होता.

नंतर एका कोस्टा रिकन कुटुंबाच्या घरी त्यांच्या पद्धतीचे जेवण घेतले. सुरुवातीला ताज्या अननसाचा रस होता. थाळीमध्ये भात, पिंटो बीन्स, सॅलड, केळीची भजी, पामच्या फळापासून बनवलेला एक पदार्थ, मक्याच्या टॉर्टिया, चटणी, पपई व आंब्याच्या फोडी असे चविष्ट जेवण होते.

चौथ्या दिवशी आम्ही 'आरेनल' हा तिथला सर्वात मोठा कृत्रिम जलाशय बोटीतून पार करून 'मॉंटेवर्दे' ह्या ठिकाणी पोचलो. संध्याकाळी कॉफी, कोका आणि उसाच्या लागवडीची टूर घेतली. कॉफीची फळे तोडून, त्याच्यातल्या बिया वेगळ्या काढून, वाळवून, त्या भाजून, दळून त्याची कॉफी बनवेपर्यंतच्या सर्व प्रक्रिया बघायला मिळाल्या. 'ग्रीन टी' प्रमाणेच 'ग्रीन कॉफी' आरोग्यासाठी कशी चांगली आहे हा आश्चर्यकारक बोध झाला आणि कॉफी अधिकाधिक भाजल्यामुळे त्यातली पोषणमूल्ये कशी नष्ट होत जातात ते समजले.

'मॉंटेवर्दे' हे ठिकाण अतिशय उंचावर असल्यामुळे इथे सदोदित सोसाट्याचा वारा होता. त्या वाऱ्याबरोबर येणारा पाऊस एका क्षणात सर्वत्र विखुरला जात होता. त्या वाऱ्याचा आवाज रात्रभर हॉटेलच्या रूममध्ये येत होता. 'मॉंटेवर्दे' ह्या ठिकाणी खूप प्रसिद्ध असे 'क्लाउड फॉरेस्ट' आहे. हे जास्त उंचीवर असल्यामुळे इथले जंगल हे वर्षातून बराच काळ मेघाच्छादित असतं. त्यामुळे इथे रेन फॉरेस्टपेक्षा वेगळी झाडे आणि प्राणीपक्षी आढळून येतात. चौथ्या दिवशी आम्ही ह्या क्लाउड फॉरेस्टची सफर केली. इथल्या टूर गाईडला खूप चांगली माहिती होती आणि तो भरभरून आम्हाला ती पुरवत होता. कोस्टा रिकामध्ये १२ प्रकारचे 'microclimates' म्हणजेच 'सूक्ष्म हवामान' आढळून येते. त्याला अनुसरून निसर्गातील बदल आपल्याला ठळकपणे बघता येतात. ह्या देशाच्या पश्चिमेला पॅसिफिक समुद्र आहे तर पूर्वेला कॅरिबियन समुद्र आहे. पॅसिफिक समुद्रकाठचे हवामान दमट आहे तर कॅरिबियन समुद्रालगतचे हवामान उष्ण व कोरडे आहे. रेन फॉरेस्ट आणि क्लाउड फॉरेस्ट ह्यातला फरक आम्हाला निश्चितच जाणवला. काही वर्षांपूर्वी इथल्या मूळ जंगलाचे वैभव नष्ट होत चाललं होतं. पण सरकारच्या विविध प्रयत्नांमुळे आता हे जंगल संरक्षित झालं

आहे आणि एवढंच नव्हे तर आजूबाजूच्या परिसरात नव्याने वनीकरण झालं आहे. हे नव्यानं झालेलं दुय्यम वनीकरण भरपूर पाण्यामुळे मूळ जंगलाइतकंच फोफावते आहे. इतकं की आपल्याला त्यातला फरकही समजू नये.

इथे बऱ्याच ठिकाणी आढळून येणारा एक चमत्कारिक प्राणी म्हणजे 'स्लॉथ'. चयापचय प्रक्रिया धीमी असल्यामुळे ह्या प्राण्याची हालचाल खूप कमी असते. दिवसाचा बराच वेळ झाडाच्या एका फांदीला खिळून असतो. सॅक्रोपिया हे त्याचं आवडतं झाड. झोपेतून उठला की ह्या झाडाची काही पाने खातो. ती खाऊन तो दमतो व पुन्हा निद्रिस्त होतो. गंमतीची गोष्ट अशी की त्याला कॅमेऱ्यात टिपण्यासाठी आपल्याला सुद्धा बराच वेळ प्रतीक्षा करावी लागते.


'मॉंटेवर्दे'च्या मेघवनाचा स्तिमित करणारा अनुभव घेऊन आम्ही ५ तास प्रवास करून पाचव्या दिवशी 'मॅन्युएल अँटोनियो' ह्या पॅसिफिक समुद्रकिनाऱ्यावरच्या गावाला पोचलो. आमचे हॉटेल हे एका जंगलातच होते. त्यामुळे हॉटेलमध्ये बसूनच सभोवतीच्या वनराईत असंख्य पक्षांचे दर्शन झाले.

इथलं निसर्गसौंदर्याने नटलेले सुप्रसिद्ध राष्ट्रीय उद्यान हे समुद्र किनाऱ्याला लागून आहे. नयनरम्य अश्या ह्या उद्यानात विपुल प्राणीसंपदा आहे. इथे लाल रंगाचे खेकडे, सरडे, साप, फुलपाखरे, माकडे, जंगली डुक्करे, अळ्या, कोस्टा रिकाचा राष्ट्रीय पक्षी 'थ्रश', ग्वाटेमालाचा राष्ट्रीय पक्षी 'केत्झल' अशा विविध प्राणिमात्रांचे दर्शन झालं.

इथल्या समुद्रकिनाऱ्यावर आणखी एक सरपटणारा प्राणी दिसला - 'इग्वाना'. मगरीपेक्षा लहान पण बऱ्यापैकी आकाराने मोठा असलेला प्राणी सर्वत्र मुक्त संचारत होता. त्याला बघून पहिल्यांदा आम्ही घाबरलो. नंतर कळले की हा शाकाहारी असून माणसांना काही धोका नाही.

आणखी एका पक्ष्याचा उल्लेख करणं जरुरीचं आहे. तो म्हणजे - 'टुकान'. पिवळ्या, लाल, केशरी अशा विविध रंगांची चोच असलेला हा सुंदर पक्षी खूप वेळा दिसला. त्याची चोच तुलनेने त्याच्या शरीरापेक्षा मोठी असते. तिच्या वजनामुळे ह्याला सलग उडता येत नाही. थोडा वेळ उडून तो आकाशातच पंख फडकावयाचे थांबतो, काही काळ तसाच लहरत जातो आणि मग दम खाऊन पुन्हा विहरत जातो.
इतक्या दिवसात आम्हाला 'स्कार्लेट मकाव' हा मनोहारी पक्षी दिसला नव्हता. एका संध्याकाळी त्या पक्षाचा एक मोठा कळप हॉटेलच्या समोरच्या झाडावर दिसला आणि आम्ही धन्य झालो.

इथे आढळणाऱ्या ३ प्रकारच्या माकडांपैकी केशरी पाठ असलेली 'squirrel monkeys' जातीची माकडे आमच्या हॉटेलमध्ये प्रचंड प्रमाणात होती. ती खूप चपळ असतात व आकर्षक दिसतात. आमच्या हॉटेल मधल्या सगळ्या रेस्टॉरंट्समध्ये ती छतावरून, आजूबाजूच्या झाडांवरून पटापट उड्या मारून लोकांच्या प्लेटमधले पदार्थ पळवून न्यायची आणि सर्वांची खूप करमणूक व्हायची. ह्या हॉटेलची टॅगलाईन होती ‘still more monkeys than people’.



शेवटच्या दिवशी तिथल्याच एका जवळच्या जंगलात आम्ही जवळपास २ तास घोडेसफारी केली. हिरवेकंच जंगल, मधून मधून भुरभुरणारा पाऊस, शेजारून खळाळत जाणारी एक नदी, घोड्याच्या खुरांचा आवाज, बाकी आसमंतात भरून राहिलेली प्रसन्नता आणि त्या सफारीच्या शेवटी एक विलोभनीय असा धबधबा. त्या देशातले शेवटचे क्षणही इतके मोहरून गेले की अमेरिकेत परतल्यावर पुढचे काही दिवस आमचं मन कोस्टा रिकातच घुटमळणार आहे हे नक्की होतं.

आम्ही ह्या देशाच्या नैसर्गिक विविधतेची एक झलक बघितली. निसर्गाच्या सान्निध्यात आमचा एक आठवडा कसा गेला ते कळलंच नाही. निसर्ग आपल्याला किती भरभरून देत असतो आणि आपल्या लोभी वृत्तीने आपण निसर्गाचा किती ऱ्हास करत आहोत हे पदोपदी आम्हाला जाणवत होतं. त्यातच भावलेली आणखी एक गोष्ट म्हणजे इथल्या लोकांचा साधेपणा आणि खरेपणा. निसर्गाच्या कुशीत राहून अतिशय निवांत, सुदृढ आणि तणावमुक्त असं त्यांचं राहणीमान आहे. खाण्यापिण्यातही कमीतकमी प्रक्रिया केलेले पदार्थ वापरून, उपलब्ध फळं आणि भाज्यांचा खूप चांगला वापर केलेला आहे. तुम्हाला एक नवलाईची गोष्ट माहित्ये का? ह्या देशाकडे स्वतःचे सशस्त्र सैन्य नाही. त्यामुळेच हा देश शिक्षणावर आणि आरोग्यावर भरपूर खर्च करू शकतो. आम्हाला नंतर समजलं की 'सुखी' देशांच्या क्रमवारीत हा देश खूप वरती आहे. पण आम्हाला त्याचं अजिबात नवल वाटलं नाही कारण ह्या देशाचे राष्ट्रीय प्रतीकच आहे ‘pura vida’! ते किती सार्थ आहे हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवलं ह्यातच आम्हाला खूप समाधान आहे.

- **अमित भावे,** गार्डन ग्रोव, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## देशाटन-विदेशाटन



**श्री. विवेक गोळे**
**संचालक**

अमेरिकेतील मराठी पर्यटकांना आमचा मानाचा मुजरा! यापूर्वी कधीतरी तुम्ही आमच्याकडे एअर तिकीट किंवा व्हिसा या सर्विसेस घेतल्या असतील किंवा आमच्या एखाद्या सहलीला जॉईन झाले असालच. मध्यंतरी आम्ही स्वीडनला ग्रुप केला होता. त्यातील २० पर्यटक अमेरिकेतून सहभागी झाले होते आणि त्यांचे २० मित्र भारतातून सहभागी झाले होते. सगळ्यांनी एकत्र ट्रीप केली. अमेरिकेत राहणाऱ्या अनेक मराठी बांधवांनी आमच्याकडे तिकीट घेताना कधी सिंगापूर एअरलाइन्स चे तिकीट घेऊन सिंगापूर बघितले. तर कधी कॅथे पॅसिफिक एअरलाइन्स चे तिकीट घेऊन हॉंगकॉंग बघितले. तर कोणी स्वित्झर्लंड पाहिले. काही जणांनी अमेरिका बरोबर कॅनडा अलास्का क्रूझ केली आहे . आपल्या भारतातल्या सहली असो अथवा भारताबाहेरील, आपल्या हक्काच्या एजन्सीला तुम्ही कधीही मेल करू शकता अथवा फोन करू शकता आणि तुमची सहल बुक करू शकता. आपले नम्र भाग्यश्री टूर्स टिम्स.

*Journey Since 1981*
**Bhagyashri** Travels Pvt. Ltd.
अनुभव जगाचा, विश्वास भाग्यश्रीचा

11, Namjoshi Bhavan,
Lal Bahadur Shastri Road,
486 Sadashiv Peth,
Pune-411030

पुणे - +91 9595 300 900
020 2450 8121-32
मुंबई - +91 7709 000 399
ठाणे - +91 7709 000 392

www.bhagyashritravels.com

+91 9561000076

**OFFICE TIME**
**Mon. To Sat. 10 To 6**

# दर्जेदार आनंददायी सहली !

## भारतातील सहली

काश्मीर I शिमला मनाली I नैनिताल मसूरी I दार्जिलिंग गंगटोक पेलिंग I लेह लडाख I ३ सिस्टर्स I अंदमान I कोस्टल कर्नाटक I केरळ I गुजरात I राजस्थान (मेवाड, मारवाड) I ओडिसा I मध्य प्रदेश I दिल्ली आग्रा जयपुर I कूर्ग काबिनी

**यात्रा :** नर्मदा परिक्रमा I पिठापूर -कुरवपूर I काशी-गया-प्रयाग I चारधाम I तिरुपती रामेश्वर कन्याकुमारी

**फेस्टिव्ह टूर्स :** गणेश उत्सव I सवाई गंधर्व संगीत महोत्सव I आषाढी वारी पालखी सोहोळा

## आंतरराष्ट्रीय सहली

दक्षिण अमेरिका I अलास्का - क्रुझेस I अमेरिका ईस्ट कोस्ट I अमेरिका वेस्ट कोस्ट I कॅनडा I स्कॅन्डीनेव्हिया I युरोप I दुबई I बाली I सिंगापूर I थायलंड I स्पेन, पोर्तुगाल I ग्रीस, टर्की I व्हिएतनाम, कंबोडिया I ऑस्ट्रेलिया I अझरबैजान, जॉर्जिया I साऊथ आफ्रिका I केनिया I मलेशिया I श्रीलंका

## आंतरराष्ट्रीय विमान तिकीट

मुंबई - न्यूयॉर्क - मुंबई - ₹ ७०,०००*
मुंबई - सॅनफ्रान्सिस्को - मुंबई - ₹ ८०,०००*
मुंबई -वॉशिंग्टन डी. सी. - मुंबई - ₹ ७५,०००*
मुंबई - शिकागो - मुंबई - ₹ ८०,०००*

*T&C apply. Subject to fair availability

## भाग्यश्रीची टूर म्हणजे वर्षभरासाठी आनंदाचा बुस्टरच !

- अनुभव सहलीचा गेल्या ४४ वर्षांचा
- कम्फर्टेबल आयटीनरी
- लक्झरीअस हॉटेल्स / ५ स्टार
- एसी कोचेस ने प्रवास
- सर्व स्थलदर्शन खर्च समाविष्ट
- उत्कृष्ट आणि रुचकर भोजन
- अनुभवी उत्साही आणि तरुण टूर लीडर

## DIRECT CONTACT

**International Tours :** mktg@bhagyashritravels.com, +91 94037 70592
**Domestic Tours :** tour9@bhagyashritravels.com, +91 77090 00396
**Air Ticketing :** intair1@bhagyashritravels.com, +91 94037 70593

*Terms &Conditions apply

**WE ARE MEMBER OF**

पर्यटन मंत्रालय MINISTRY OF TOURISM | TAAI | TAFI THE WAY FORWARD | TAAPI | IATO INDIAN ASSOCIATION | IATA

Follow us on : bhagyashritravels I www.bhagyashreetours.com

# ताटली...

बायकांना भांडी जमवण्याची खूप हौस असते. बाजारात येणाऱ्या नविन भांड्यांना म्हणूनच मागणी असते. वेगवेगळ्या आकाराच्या, वेगवेगळ्या धातूंच्या स्वयंपाकघरासाठी गोष्टी जमवणे, त्यासाठी मुद्दाम तुळशीबाग वगैरे सारख्या ठिकाणी जाणे, आणि २/४ तास वेळ घालवून अगदी मिसळण्याच्या डब्यातले छोटे चमचे आणणे, ह्यात जे सुख आहे ते पुरूषांना नाही कळायचे.

पण हळू हळू काही जुन्या गोष्टी मिळेनाशा झाल्या. आता तर नवीन संसारात या गोष्टी लागतच नाही म्हणाना.. उदाहरणच घ्यायचे म्हटले तर ताटली... आमच्या घरात किती प्रकारच्या ताटल्या असायच्या आणि त्यांचा कसा वेगवेगळ्या प्रकारे वापर केला जायचा.

१) छोटी देवघरात, पूजेसाठी - ती चांदीची असू शकते, स्टिलची असते. छोटी असल्यामुळे गोंडस दिसते. काहींना बारीकशी कड असते. थोडी खोलगट असते. ती इतर भांड्यात न टाकता पूजा करणारा धुवून ठेवतो. त्यामुळे ती स्वच्छ, नव्यासारखी दिसते. फारशी बदलली जात नाही. एकच वर्षानुवर्षे वापरली जाते.

२) वाटी, पेला ह्यांच्यावर झाकण्यासाठी. वाटी किंवा पाण्याच्या पेल्यावर बरोबर बसेल अशी असते. अशा अनेक छोट्या ताटल्या असतात. बऱ्याच वेळा वाटीतले वापरले की दोन्ही धुवायला टाकले जाते. कधी कधी वाटीत काही काढले, चाटण, थोडेसे उरलेले, तर ती ताटली वाटीवरून काढली की उलटी करून, खाली ठेवली जाते. काम झाले, की परत सुलटी, वाटीवर झाकण म्हणून ठेवली जाते. गरम चहा, दूध, कॉफी यावर छोटीच ताटली उलटी ठेवली जाते, वाफ येते म्हणून! मग ती खाली ठेवताना सुलटी ठेवली जाते.

३) त्यानंतरची थोडी मोठी ताटली. छोटा कुंडा, छोटी पातेली यावर झाकायला, फ्रिजमध्ये ठेवायला, ही बऱ्याचवेळा सपाट असते, एकावर एक भांडी ठेवता येईल अशी असते.

४) त्यानंतरचा मोठा आकार म्हणजे, पोहे, उपमा असे काही देता येईल अशी ताटली. त्यातही मिनी थाळी सारखी कड असलेली, एकच पदार्थ, थोडासा द्यायचा, तर छोटी ताटली, २/४ पदार्थ द्यायचे असले तर जरा मोठी. ह्या ताटल्या सपाट नसतात जरा खोलगट असतात. जेवतानाही त्यातल्या छोट्या ताटल्या वाटी ऐवजी पातळ भाजी, ढोकळा, श्रीखंड इ. देण्यासाठी वापरता येतात, पाहुणे आले तर एखादी लाडू, चिवडा देण्यासाठी पटकन पुढे करता येतात.

पण धिरडे, थालीपीठ, पिझ्झा, डोसा अशांसाठी सपाट ताटली चालू शकते. अशा या सगळ्या ताटल्या स्टीलच्याच असायच्या. त्याला तेल, तूप, रस वगैरे चिकटले असेल तर ते बोटानी चाटून पुसून साफ करण्यात मजा असायची. ताटली साफ करूनच धुवायला टाकायची, नाहीतर कामवाली नीट धुवत नाही किंवा सगळी भांडी तेलकट होतात वगैरे ताकीद लहानपणी आईची असायची. पूर्वी घरात काही नविन केले कि अशी ताटली भरून शेजारच्या घरी नमुना म्हणून आठवणीने पाठवायची पद्धत होती.

५) या नंतरची साईज ताटलीची म्हणजे दुधावरची. पूर्वी भोकं असलेली किंवा जाळीची स्टीलची ताटली दूधासाठी असायची. ती दूध सोडून इतर कशाला वापरायची नाही. जाळी किंवा भोकं मुद्दाम असायची. का बरं? साधी ताटली ठेवली तर दुधाची वाफ ताटलीवर येऊन ते पाणी दुधात पडत असावे , (म्हणून ताटली पण तिरकी, थोडे पातेले उघडे ठेऊन ठेवतात) म्हणून भोकं वाली पण असावी. त्यांनी दूध पण लवकर गार होत असावे.

आता अशा ताटल्यांची पण गरज उरली नाही. अमेरिकेत तर नाहीच नाही.

कधी पातेले वरपर्यंत भरेपर्यंत पातेल्यात दूध, कढी, आमटी असे असते. वरपर्यंत आले सर्व की लगेच ताटली ठेवता येत नाही, कारण ताटलीला आतला द्रव पदार्थ चिकटायची भिती असते. मग खोलगट ताटली सरळ न ठेवता, उलटी ठेवली जाते. मग फ्रिज मध्ये ठेवताना, दोन्ही हातांनी पातेली धरून, फ्रिजमध्ये ती ठेवावी लागते. काढताना काळजी घ्यावी लागते. एका हाताने घेताना, ताटली उलटी ठेवलेली असल्यामुळे पडण्याची शक्यता असते.

त्यानंतरचा आकार ताट, थाळा वगैरेचा. नंतर प्लॅस्टीक, काच, थर्माकोल, मेलमाईन, सिरॅमिक, मायक्रोवेव्ह सेफ डिनर सेट अशी अनेक प्रकारामुळे ताटली हा शब्द मागे पडून प्लेट हा शब्दच जास्त ऐकायला यायला लागला. काचेची हॅण्डल वाली झाकणं आल्यामुळे पातेल्यावर झाकण म्हणून ठेवण्याच्या ताटलीची गरज वाटेनाशी झाली.

अमेरिकेन घरात प्लेटस् चा सुळसुळाट असल्यामुळे ताटली औषधालासुध्दा काही घरांत नसते, अशी सध्याची परिस्थिती आहे. बिच्चारी ताटली...

तुमच्या घरी, इथे आहेत का हो ताटल्या? असल्या तर जपून ठेवा हं...

- **चित्रा जुवेकर मेहेदळे,** सिॲटल, वॉशिंग्टन

## सहज सुखद सहवास गुरूंचा

भारतीय तत्वज्ञान

‘सहज सुखद गुरूंचा’ हे सद्गुरू परम पूज्य श्री. श्रीराम महाराज रचित भजनातील शब्द आहेत. अध्यात्म क्षेत्रात सद्गुरूंचे महत्व फार मोठे आहे, किंबहुना सद्गुरूंशिवाय अध्यात्मात प्रगतीच होऊ शकत नाही. हे विधान आचार्य शंकराचार्य ह्यांच्या दुर्लभ त्रयीवरून सिद्ध होते. आचार्यांनी सांगितलेली दुर्लभ त्रयी म्हणजे, “मनुष्यत्वं, मुमुक्षत्वं आणि महापुरुषसंश्रय”.

**मनुष्यत्वं :** मनुष्य जन्म मिळणे आणि मानवी मूल्यानुसार आयुष्य जगणे.

**मुमुक्षत्वं :** मोक्षाची इच्छा असणे, जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा आणि त्यानुसार स्वतःच्या आयुष्यात बदल करून घेण्याची संपूर्ण तयारी.

**महापुरुषसंश्रय :** सद्गुरू प्राप्ती आणि सदैव सद्गुरूच्या सानिध्यात राहणे सहज सुखद सहवास गुरूंचा म्हणजेच महापुरुषसंश्रय. हा कसा साधायचा.

प्रत्येक वेळी देहाने आपल्या सद्गुरुंच्या सानिध्यात राहणे हे प्रापंचिक माणसाला शक्य नसते आणि मोक्षापर्यंत जाण्यासाठी सद्गुरू सहवासाची अत्यंत आवश्यकता आहे. हे कसे साधायचे हे समजावून सांगताना पूज्य श्रीराम महाराज म्हणतात की श्वासाचे अनुसंधान साधायचे. म्हणजे आपण घेत असलेल्या प्रत्येक श्वासाची आपल्याला जाणीव झाली पाहिजे. ही जाणीव होण्यासाठी आपलं लक्ष सदैव श्वासावर असावं लागत. लक्ष श्वासावर म्हणजेच मन हे श्वासावर केंद्रित असलं पाहिजे आणि मन एक ठिकाणी स्थिर होण्यासाठी ते इकडे तिकडे भटकायला नको.

परंतु मन हे सदैव भटकतच असते. त्याला सतत काही ना काही हवे असते. इच्छा किंवा कल्पना या कधी संपतच नाहीत. ह्यावरील उपाय सद्गुरू परम पूज्य श्री. नारायण महाराज त्यांच्या सहजयोग या ग्रंथात सांगतात. सर्वप्रथम पूज्य नारायण महाराजांनी सहज हा शब्दाचे विश्लेषण केले आहे.

ते म्हणतात सहज म्हणजे “**स** + **ह** + **ज**”. “**स**” कर हे शक्ती बीज आहे. हे बीज हे नाम रूपात्मक दृष्य जडाचा उद्भव दर्शविते. “**ह**” कार हे पुरुष बीज (ब्रह्मतत्त्व) मानले गेले आहे. हे बीज जडाचा लय दर्शविते.

या दोहोंच्या परस्पर सानिध्यात उत्पन्न होणारी स्थिती म्हणजे ‘सहज’ अवस्था. शक्ती आणि ब्रह्म वस्तुतः एकरूप असलेल्या दोनच्या समन्वयाने अथवा साक्षित्वाने अनुभव घेण्याचा अभ्यास म्हणजेच सहजयोगाचा मार्ग.

सहजयोग म्हणजे काय हे समजावून सांगताना पूज्य नारायण महाराज म्हणतात, “सहजयोग म्हणजे कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, योगशात्र ह्यांचा समन्वय” म्हणजेच ह्या सर्व मार्गांचे एक सुरेख मिश्रण. हे मिश्रण प्रत्येक व्यक्तीसाठी त्याच्या प्रकृतीनुसार ठरते, जे सद्गुरू जाणतात आणि त्यानुसार ते आपल्या शिष्याला मार्गदर्शन करतात. In short it is personalized sadhana for a person. पूज्य नारायण महाराज सांगतात की हे सर्व मार्ग एकमेकांना पूरक आहेत. फक्त एकच मार्ग निवडला तर कदाचित मनुष्य एकांगी विचार करू शकतो आणि त्याची फसगत होऊन शकते.

या सहजयोगाचा मूळ पाया म्हणजे, आपण कोण आहोत याची अनुभविक ओळख आपल्याला प्राप्त होणे आणि ही ओळख फक्त सद्गुरुंच्या मार्गदर्शनानेच शक्य होते असेही पूज्य नारायण महाराज स्पष्ट करतात. सहजयोग समजावून सांगताना पूज्य नारायण महाराज मनुष्याचा हा आध्यात्मिक प्रवास कसा होतो हेही सांगतात. तो थोडक्यात इथे सांगत आहे.

सुरवात ही मुमुक्षत्वातून होते. मुमुक्षुत्वची परिसीमा झाली मग महापुरुषसंश्रयाची पायरी येते, अर्थात सद्गुरू प्राप्ती होते. मग सुरु होतात ते शिष्याचे प्रयत्न, शिष्याच्या प्रयत्नांनुसार सद्गुरू कृपा होत असते. शिष्याचा आत्मसमर्पण भाव वाढून तो परब्रह्म स्वरूपी सद्गुरू चरणी लीन होतो. आत्मसमर्पण सुरू झाले की शिष्याचे आत्मचिंतन वाढत जाते. आत्मचिंतनाने त्याचे मन अंतर्मुख होऊ लागते. अंतर्मुख मन त्याला अनुसंधान टिकवण्यास मदत करते. असे श्वासाचे अनुसंधान शिष्य टिकवू लागला की त्याला निर्विकल्पता लाभू लागते. त्याचा श्वास स्थिर राहू लागतो आणि हळूहळू तो साक्षित्वाने सर्व व्यवहार करू लागतो. हीच ती तुर्या अवस्था.

पूज्य श्रीराम महाराजांच्या या भजनामध्ये श्वासाचे अनुसंधान असले की आपल्यातील ब्रह्मतत्वाचा अगदी सहज अनुभव येतो ह्याचेच वर्णन केले आहे आणि या ब्रह्मानुभवालाच पूज्य श्रीराम महाराज सहज सुखद सहवास गुरूंचा असे म्हणतात, कारण सद्गुरू हे ब्रह्मस्वरूपी आहेत.

श्री सद्गुरुनाथ महाराज की जय. जय श्रीराम

- **वृषाली राऊत,** कुपरटीनो, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## नितीन सोनवणे: एक गांधी शांती पदयात्रीचा प्रवास



"आपल्या जीवनाचे आणि सृष्टीचे अंतिम सत्य काय?" या प्रश्नाने व्याकूळ झालेल्या नितीन सोनवणे यांनी वयाच्या १७व्या वर्षी घर सोडले. गौतम बुद्ध यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सत्याच्या शोधासाठी कंफर्ट झोन सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांना समजले की, सत्याच्या जवळ जाण्यासाठी आपल्याला नेहमीच स्वतःच्या मर्यादांच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे.

नितीन यांनी महाराष्ट्र गांधी स्मारक निधीत दीड वर्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासोबत काम केले. या काळात त्यांनी महात्मा गांधीजींच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांवर सखोल चिंतन केले. गांधीजींच्या असामान्य कार्यप्रेरणेने प्रभावित होऊन त्यांनी गांधी विचार जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा ध्यास घेतला. १८ नोव्हेंबर २०१६ रोजी सेवाग्राम आश्रम, वर्धा येथून नितीन यांनी गांधी शांती पदयात्रेला सुरुवात केली. ही यात्रा महात्मा गांधीजींच्या १५०व्या जयंतीला समर्पित होती. सातत्याने चालणे आणि लोकांशी संवाद साधत त्यांनी जगभरातील विविध देशांमध्ये गांधीजींच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांचा प्रसार केला.



आतापर्यंत नितीन यांनी ५१ देशांमध्ये २०,००० कि.मी. चालत आणि २५,००० कि.मी. सायकलने प्रवास केला आहे. त्यांच्या प्रवासात विविध देशांच्या दूतावासांनी, भारतीय लोकांनी, शाळा-कॉलेजांनी आणि स्थानिक लोकांनी मोलाची साथ दिली.

भारताबाहेरील शाकाहारी आहाराची कठीण परिस्थिती असो वा वेगवेगळ्या देशांतील भाषेचा अडथळा, नितीन यांनी या सर्व आव्हानांवर मात केली. नितीन यांच्या प्रवासात अनेक आव्हाने होती. अमेरिकेसारख्या देशाचा व्हिसा मिळवणे अत्यंत कठीण होते. परंतु, त्यांच्या पवित्र हेतूने आणि स्पष्ट संवादाने त्यांना हे आव्हान सहज पार करता आले. तुर्कीमध्ये दही आणि ब्रेड, दक्षिण अमेरिकेत भात आणि राजमा, तसेच रस्त्यावर मिळणारी फळे खाऊन त्यांनी आपले शाकाहार कायम ठेवले. भाषिक अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी गुगल ट्रान्सलेटरचा वापर केला आणि स्थानिक भाषांमध्ये तयार केलेली पत्रके लोकांना दिली. नितीन सध्या सॅन होजे, कॅलिफोर्निया येथे आहेत. २६ जानेवारी २०२५ रोजी ते सॅन फ्रान्सिस्को ते वॉशिंग्टन डीसी असा ७,००० कि.मी. चा २०५ दिवसांचा प्रवास सुरू करणार आहेत.



नितीन यांना विश्वास आहे की मानव जातीला अंतिम सत्याच्या जवळ जाण्यासाठी अजून खूप वेळ लागेल. त्यांनी लक्षात आणून दिले की, आपण फक्त "मानव" या ओळखीपर्यंत सीमित राहिलो तरच शांतता प्रस्थापित होऊ शकते. धर्म, जात, देश, त्वचेचा रंग यावर आधारित द्वेषाला नकार देत त्यांनी जागतिक शांततेसाठी गांधीजींच्या विचारांची महत्त्वपूर्ण गरज सांगितली. नितीन यांनी त्यांच्या प्रवासात लाखो तरुणांशी संवाद साधला. त्यांना विश्वास आहे की तरुणच खरा बदल घडवू शकतात. सत्य, अहिंसा, आणि मानवतेच्या तत्त्वांचा प्रचार करून नितीन यांची गांधी शांती पदयात्रा हा एक जागतिक प्रेरणेचा दीपस्तंभ ठरला आहे.

## लॉस एंजेलिस - निधी संकलन

लॉस एंजेलिस येथील वणव्यांसाठी लॉस एंजेलिस मराठी मंडळ कार्यरत: अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठी नैसर्गिक आपत्ती म्हणून ज्याची नोंद झाली आहे त्या California WildFires मध्ये होरपळलेल्या नागरिकांना महाराष्ट्र मंडळ लॉस एंजेलिस तर्फे मदतीचा हात पुढे करण्यात आला.

सर्वप्रथम आगीचे वृत्त आल्यावर मंडळातर्फे सभासदांना एक Email पाठवून खबरदारीचे व सुरक्षिततेचे उपाय यांची माहिती देण्यात आली. आगीची झळ पोचलेल्या नागरिकांना मंडळातर्फे काही मदत हवी असल्यास संपर्क साधण्यासाठी मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करण्यास सांगण्यात आले.

मंडळातर्फे निधी संकलन सुरू करण्यात आले आहे. मंडळ या देणग्या ३१ जानेवारी २०२५ पर्यंत स्वीकारेल आणि जमा झालेल्या देणगीची रक्कम विश्वासाई संस्थांना सुपूर्द केली जाईल, याशिवाय,मिळालेल्या देणग्यांच्या रकमेच्या २०% रक्कम (कमाल मर्यादा $2000 मात्र) मंडळातर्फे निधी म्हणून देण्यात येईल.

लॉस एंजेलिस मराठी मंडळ आपल्या सभासदांच्या मदतीसाठी सदैव तत्पर आहे.

**Pramod Vaiti** - President

**Mrunal Welankar**- Secretary

**Yash Jog** - Treasurer | **संपर्क:** treasurer@mmla.org

सुवर्णमहोत्सव
BMM मेळावा २०२५

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

# 3 days of Marathi Extravaganza

# BMM2025 & NEOMM

Co-hosts: Pittsburgh, Columbus, Cincinnati, Buffalo, Detroit

## Golden Jubilee Celebration!

## June 13, 14 & 15

Only $250

Drama, Classical, Rock, Poetry, Food, Friends & Fun!








## Severance Hall, Cleveland, Ohio

**50 years ago, in 1975, a handful of Marathi families living in the area at that time came together and founded Northeast Ohio Marathi Mandal (NEOMM) - a non-profit 501c(3) - to celebrate the rich and ancient Marathi culture in the Northeast Ohio region. NEOMM is a proud member of Bruhan Maharashtra Mandal (BMM) - the national body of all Marathi organizations in the USA and Canada. BMM has awarded the rights to host its prestigious 2025 Maitree-Melawa event (regional convention) to NEOMM!**

**It's my great pleasure to invite you to this auspicious occasion! - Tanmayee Dixit, Covener**

**Hightlights**

Star-studdeed lineup straight from Maharashtra!

Shaan - first time ever with Marathi-Hindi songs, Prashant Damle, Mahesh Kale, Sankarshan Karhade, Nihira Joshi, Salil Kulkarni, Shaunak Abhisheki, Shubhankar Kulkarni and more!

Yayati and Devayani by popular demand!

The Best of North America Talent show!

Friends and family sit together

1 adult (18+) ticket includes 1 free child ticket

Priority access to nearest hotels | Negotiated hotel rates

3 meals, 2 breakfasts, tea/coffee snack stations

Prestigious banquet dinner with artists, sponsors and donors (available for purchase)

**Contact: Prasad Panwalker, BMM President (512) 294-3229, Dr. Medha Godbole, BMM EC (440) 241-3167 or your Local Mandal President**

## निशब्द संवाद ...

एक परस्पर विरोधी जोडी. पण याबद्दल लिहितेय म्हणजे यातच सर्व आलं नाही का ?

शब्दावाचून होणारा पण शब्दांच्याही पलिकडे जाऊन खूप काही अर्थ सांगून जाणारा असा हा संवाद. शब्द जणू थिटे पडावे इतक्या भावना जेव्हा अनावर होतात ना तेव्हा घडते तो हा निशब्द संवाद. तसं तर प्रत्येक जण मनात हा संवाद करतच असतो. आपला आपल्याशीच. कुणी ह्याला सदसद्विवेकबुद्धी म्हणतं तर कुणी मनातील वाणी. ती सततच मार्गदर्शन करत असते. हा संवाद सर्वांच्याच परिचयाचा तरीही त्यात फक्त शब्द उच्चारले जात नाहीत, मनातल्या मनात उच्चार चालू असतोच. केवळ ध्वनी बाहेर येत नाही म्हणून तो काहीसा नि:शब्द म्हणता येईल.

तुम्ही खूप दमून भागून घरी आलात आणि घरातल्या व्यक्तिने तत्परतेने न मागता पाणी आणि एक कडक चहा आणून दिला की झाला की नि:शब्द संवाद. मी खूप दमलेय, जरा शांत बसून चहा प्यावासा वाटतोय म्हणजे तरतरी वाटेल ...यातलं काहीही न सांगता ते या हृदयीचे त्या हृदयी पोहोचणे यातच तर खरी नि:शब्दतेची ताकद आहे.

ऑफीसमधून घरी येताना पानात गुंडाळलेला गजरा किंवा चाफ्याची फुलं बायकोच्या ओंजळीत देताना “माझं तुझ्यावर किती प्रेम आहे!”, हे घिसेपिटे शब्द उच्चारण्याची गरजच राहत नाही. त्या दिलेल्या गजऱ्याच्या सुगंधाबरोबरच त्याच्या हृदयीचा सुगंध तिच्या हृदयी अलगत जाऊन विराजमान होतो.

चांदण्या रात्री समुद्रकाठी तिचा हात हातात घेऊन नुसतं चांदणं झेलत बसून राहीलं तरी तू आणि मी आता कायम सोबत असू हा संदेश नि:शब्दतेतून अधिकच गडद होतो.

कधी कधी ही नि:शब्दता मात्र खूप अंगावर येते.एखाद्या जीवलगाचा मृत्यु झाला की मनात आकांत असला तरी एकही शब्द बाहेर येत नाही, येतात ते फक्त अश्रु! त्याही वेळी कोणा आप्ताच्या प्रेमळ स्पर्शातून दिलाशाची एक नि:शब्द जाणीव मात्र हृदयाला भिडते. ‘शब्देविण संवादू’ तो हाच असावा. तुझ्या दु:खाची मला पूर्ण जाणीव आहे. मी एका मायेच्या स्पर्शापलिकडे तुझं सांत्वन करु शकत नाही ही अगतिकता आहे. पण तुला यातून बाहेर पडण्यासाठी मी सदैव तुझ्या सोबतच असेन इतकं सारं ही नि:शब्दता शिकवून जाते.

देवाच्या गाभाऱ्यात भेटीला येणारी नि:शब्दता तर एका अनामिक पातळीला घेऊन जाते.तिथली पवित्र स्पंदने त्या नि:शब्दतेतूनचं आपल्यापर्यंत पोहोचतात आणि स्वत:तच खोल खोल डोकावून पहायला भाग पाडतात.

अर्थवाही शब्द संपले आणि व्यक्त होईनासं झालं की माणूस नि:शब्द होतो.चारी वेद ज्याप्रकारे दत्तगुरूंचे वर्णन करण्यास नि:शब्द झाले तसेच.

निसर्गाच्या चमत्काराने कित्येकदा नि:शब्द व्हायला होतं. साऱ्या नि:शब्दतेतून आतला प्रकाश मात्र फाकू लागतो आणि सोऽहम् च्या प्रवासाला उद्युक्त करतो.

- **शिल्पा कुलकर्णी,** लुईव्हील, केंटकी

## नाही कशी म्हणू तुला??
## (नकाराचे महत्व)

माझ्या कॉलेजमध्ये एक मुलगा होता. एकदम सडेतोड स्वभावाचा. जे मनात असेल ते बोलणारा. त्याला एखादी गोष्ट जमणार नसेल तर सरळ “नाही जमणार ” असे सांगून मोकळा होणारा. आम्हाला नेहेमी आश्चर्य वाटायचे. असे कसे हा तोंडावर नाही म्हणू शकतो? “बघतो जमते का?” किंवा “उद्या सांगेन” असे वेळमारु उत्तर न देता नाही असे स्पष्ट सांगून मोकळा. शंकेला जागा नाही.

नकार देणे ही सर्वांसाठी इतकी सोपी गोष्ट नाही. त्यामागे बरीच कारणे आहेत. एकदम नकार देऊन आपल्या नात्यात कडवटपणा येईल, किंवा दुरावा येईल असे वाटते. नकार देऊन दुसऱ्याचे मन मोडू नये, त्यांना दुखावू नये असे वाटते. नकार दिल्याने आपल्याला वाईटपणा येईल अशीही भिती असते. काही लोक भिडस्त स्वभावाचे असतात त्यांना नाही म्हणणे तर खूपच जड जाते. कधी कधी उपकार फेडण्याची भावना आपल्याला ‘नाही’ म्हणू देत नाही. कधी दुसऱ्याच्या दबावाखाली येऊन मनात नसताना आपण एखादी गोष्ट मान्य करून जातो आणि मग पस्तावा करतो. माझ्या पिढीपर्यंत मुलींना बाळकडूच असायचे की कुटुंबातील वडील माणसे, जवळचे नातेवाईक आणि नवरा, मुले यांच्यासाठी आपले सर्व बाजूला ठेवून वेळ काढला पाहिजे. लोकांना शक्य तेव्हा (म्हणजे नेहेमी) मदत केलीच पाहिजे. त्यागाचे महत्व मनावर बिंबवले जायचे. कर्तव्य पार पाडणे किती महत्त्वाचे आहे ते सतत सांगितले जायचे. ते करताना तुमची कितीही गळचेपी,

उलाघाल झाली तरी चालेल. स्वतःच्या काही गोष्टी बाजूला ठेवायला लागल्या तरी हरकत नाही.

नकार देणे ही एक कला आणि महत्त्वाचे life skill आहे. Boundaries ही संकल्पना मला अमेरिकेत येऊन समजली. ही लक्ष्मण रेषा बऱ्याच प्रकारची असते. मानसिक, शारीरिक, वैचारिक, आर्थिक, आणि भौतिक. या आपल्या मर्यादा असतात आणि त्या प्रत्येक व्यक्तीप्रमाणे किंवा प्रसंगानुसार बदलू शकतात. तुमच्या मुलांनी हाक दिली की तुम्ही लगेच धावून जाल पण तेच ऑफिस मधली व्यक्ती असेल तर विचार कराल. यात गैर काही नाही. प्रत्येक वेळी सर्वांसाठी उपलब्ध असणे कोणालाच शक्य नाही.

मानसिक आणि शारीरिक मर्यादा सहनशक्तीवर अवलंबून असतात. दुसऱ्याला मानसिक आधार द्यायची किंवा इतर प्रकारे मदत करण्याची क्षमता मर्यादित असते. आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात अशी एक व्यक्ती असते जी नेहेमी फोन करून किंवा मेसेज करून तिच्या आयुष्यातल्या बारीक सारीक गोष्टी तपशीलवार सांगत बसते, सल्ले मागते किंवा बरोबर येण्याची विनंती करते. आपल्याशिवाय हिचे पान हालत नाही या विचाराने आपला अहं सुखावला जातो. पण कधीतरी अशी वेळ येते की आपण वैतागतो. पण इतकी वर्षे लागलेली आणि लागवून घेतलेली सवय मोडणे अवघड जाते. नाते मोडेल अशी भीती वाटते. मग आपण स्वतःवर आणि त्या व्यक्तीवर पण चिडतो. याचा मानसिक त्रास भरपूर होतो. त्याऐवजी वेळेची आणि उपलब्धतेची मर्यादा घाला. “यावेळी नाही जमणार ” असे सांगा आणि महत्वाचे म्हणजे पुढचे प्रॉमिस करून अडकून बसू नका. “आज नाही पण उद्या नक्की जमेल.” असे म्हणालात आणि त्यासाठी स्वतःची गैरसोय करून घ्यावी लागली तर अजूनच चिडचिड होईल. स्पष्ट नकार देण्यात बरेच फायदे होतील. त्या माणसाची तुमच्यावरची dependency कमी व्हायला मदत होईल. ती व्यक्ती स्वतः जास्त कार्यक्षम बनेल आणि तुमचे नाते जास्त बळकट बनेल. सुरुवातीला होईल त्रास दोघांना पण सातत्य ठेवले तर सवय होईल. याचा अर्थ असा नाही की तुम्ही कधीच मदत करु नये. जरुर करा पण स्वतःची परिस्थिती आणि क्षमता लक्षात घेऊन.

दुसरे उदाहरण म्हणजे समारंभाची आमंत्रणे. सध्या गणपती, दिवाळी, इतकेच काय तर हळदी - कुंकू हे सुदधा ‘समारंभ’ झाले आहेत. १० ठिकाणी बोलावणे आले की सगळीकडे जाणे प्रॅक्टिकल नाहीये. पण सगळीकडे गेलेच पाहिजे अशी सक्ती तुम्हीच तुमच्यावर लादून घेताय का याचा विचार करा. तुम्ही स्वतःच स्वतःवर दबाव आणत नाही ना? जरा आत्मपरीक्षण करून बघा. सर्व आमंत्रणे स्वीकारण्या मागे FOMO आहे का? किंवा हळदी- कुंकू अथवा गणपतीचे बोलावणे नाकारता येत नाही अशी अंधश्रद्धा आहे का? मुख्य म्हणजे इतकी धावपळ करून तुम्ही काय साधताय? आपल्याला स्वतःला नाही म्हणता आले तरच इतरांना नाही म्हणता येईल.

हेच परिमाण आर्थिक आणि भौतिक मदतीसाठी वापरता येईल. लोकांना वस्तू उसन्या देताना विचार करून द्या. पैसे उधार देताना जास्त रक्कम असेल तर अग्रीमेंट करु असे म्हणायला कचरू नका. तुमचा त्या व्यक्तीवर कितीही विश्वास असला तरी पैसा नात्यामध्ये वितुष्ट आणतो हे बरेचवेळा दिसते.

एखाद्या विषयावर जर तुम्हाला बोलायची इच्छा नसेल तर तसे स्पष्ट करा. सध्या अमेरिकेतले राजकारण हा ज्वलंत विषय आहे. त्यामुळे नाती तुटत आहेत. पार्टीमध्ये चर्चा चालू झाली आणि तुम्हाला भाग घ्यायचा नसेल तर तसे स्पष्ट सांगा आणि दुसरीकडे जा.

आपण आपल्या मर्यादा स्पष्ट केल्यामुळे आपण आपला आत्मसन्मान (self -respect) ठेवू शकतो आणि लोकांना पण स्पष्ट कल्पना येते की ते आपल्यावर किती दबाव घालू शकतात. नात्याची वीण घट्ट असेल तर गैरसमज न होता, उलट नाते अजून घट्ट होईल.

एक महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्हाला नकार देता आणि घेता आला पाहिजे. तुमच्या विनंतीला कोणी नकार दिला तर मोकळेपणाने, मनात किल्मिष न आणता त्याचा स्वीकार करता यायला हवा. हे सोपे नाही. आपली विनंती मान्य केली नाही की आपण दुखावले जातो. पूर्वीच्या गोष्टी आठवून दुसऱ्याला दूषणे द्यायला लागतो. मग नात्यातला कडवटपणा वाढत जातो. आपल्या भावना आपल्या तर्काच्या आड येतात. दुसऱ्याची नकार देण्याच्या मागची कारणे, परिस्थिती समजून घेण्याच्या मनस्थितीत नसतो. ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. अशा वेळेला स्वतःला सावरून, परिस्थितीचा स्वीकार करणे हे फायद्याचे ठरते. वेगळे पर्याय सापडू शकतात.

थोडक्यात काय, “नाही कशी म्हणू तुला?” हे कोडे सहजी सोडवण्यासारखे आहे. त्यासाठी मनाची घडण आणि विचारांची दिशा थोडी बदलावी लागेल. नकार देणे आणि स्विकारणे यात आत्मसन्मान आणि दुसऱ्या व्यक्तीचा आदर या दोन्हीचा समावेश आहे. थोड्या सरावाने हे सहज जमू शकेल आणि तुमचे मानसिक आरोग्य सुधारेल. बघा प्रयत्न करून.

- **अमिता खरे**, साक्रामेंटो, कॅलिफोर्निया


ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## अमेरिकेचा पहिला स्वातंत्र्य सैनिक

शेतकरी, जमिनीचे नकाशे करणारा सर्व्हेयर, सेनेचा सेनापति, देशाचे पहिले राष्ट्रपती.. ह्या सगळ्या प्रकारची कामं कोणी केली आहेत? – जॉर्ज वॉशिंग्टन!!

२०२१ साली मी चौथीत असताना मी माऊंट व्हर्नॉनला गेलो होतो. तिथे मी जॉर्ज वॉशिंग्टनचं घर पाहिलं. त्यांची ८००० एकर ची जमीन तिथे आहे. शेताची जमीन पहिली. सोळा बाजू असलेलं धान्याचं कोठार बघितलं. काही पायवाटावरून चाललो, काही टूर घेतल्या, वेगवेगळ्या जुन्या काळाच्या वस्तू पहिल्या. आणि खूप काय काय शिकायला मिळालं.

जॉर्ज वॉशिंग्टन एक महान योद्धा आणि नेता होते. त्यांचा जन्म २२ फेब्रुवारी १७३२ रोजी वर्जीनिया राज्यात झाला होता. जॉर्ज एक चांगला मुलगा होता. त्यांना सहा भावंडे होती. ते गणित आणि अंकांमध्ये खूपच हुशार होते. लहानपणापासून ते एक क्रीडापटू होते. १७४६ साली चौदा वर्षाचे होते तेव्हा, त्यांनी घोडेस्वारी करायला सुरू केली. ते घोडेस्वारीमध्ये खूपच कुशल होते. तरुण वयात त्यांनी सर्व्हेयरचे काम केले. हे काम करण्यासाठी ते घोड्यावर बसून जंगलातून प्रवास करायचे. दोन – दोन आठवडे तेचतेच कपडे घालून ते जमिनीवर झोपत होते. ते राज्यांचे आणि शहरांचे नकाशे बनवायचे. वेगवेगळ्या शहरांच्या सीमारेषा तयार करायचे.



माऊंट वेर्नॉन येथे त्यांचे घर होते. तिथे ते त्यांच्या भावाबरोबर राहत होते. २१ वर्षाचे असताना त्यांनी ब्रिटिशांच्या सैन्याबरोबर फ्रेंचच्या जिल्हयावर आक्रमण केले. ते खूप लढले पण त्यांना माघार घ्यावी लागली. काही वर्षांनी ते अमेरिकेच्या सैन्यामध्ये सामील झाले. ते सेनेचे सेनापती बनले. ब्रिटिशांबरोबर त्यांनी युद्ध केलं. ब्रिटिशांपासून अमेरिका देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्य मिळविल्यानंतर त्यांनाच् फक्त खूप सम्मान होता आणि म्हणून ते नवीन राष्ट्राचे राजा बनू शकले असते. पण त्यांनी 'राजा नाही बनायचं' असा निर्णय घेतला.

लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम, आदर, सम्मान आणि विश्वास होता म्हणूनच ते अमेरिका देशाचे पहिले राष्ट्रपती बनले. त्यांच्या राष्ट्रपतीपदाची आठ वर्षे झाल्यानंतर त्यांनी स्वत:हून शासनाचे कार्य सोडण्याचा निर्णय घेतला. कारण त्यांना वाटलं कि शासनात राष्ट्रपती म्हणून काम करण्यासाठी आठ वर्षे पुरेशी आहेत. आणि दुसऱ्या नेत्यांना शासनामध्ये काम करण्याची संधी दिली पाहिजे, असं त्यांचं मत होतं.

धैर्यवान आणि शक्तिशाली जॉर्ज वॉशिंग्टन यांना माझा प्रणाम!!

- **राघव महाजन,** बाल्टीमोर, मेरीलॅंड

## परिभाषा

**१६ जून २००२ दीपेनची डायरी**

"एकटेपण म्हणजे नेमकं काय?"
"गर्दीत देखील कोणीच सोबत नसणं"
"एकांत?"
"स्वतःच्या आतल्या स्व शी मैत्री"
"तुला काय आवडतं?"
"एकांत!"
"..."
"तुला?"
"तू"
"मी? मी काय?"
"काही नाही"
"मला ना एकांत, विपश्यना केली ना मी, तेव्हापासून आवडतो"
"हम्म"
"मला ना अमलताशचे झाड आवडते"
"का?"
"त्याच्यासारखा एकांत कोणीच साजरा करू शकत नाही"
"सगळीच झाडे करतात की...गुलमोहर काय कमी आहे? आणि जॅकारंडा?"
"तुला माहित आहे जॅकारंडा? शाब्बास!"
"?"
"सॉरी, म्हणजे...खूपशा मुलांना फुलझाडं माहित नसतात, एकांत कसा जपावा तेही उमजत नाही...पण तू.."

"मी काय?"

"तू वेगळा आहेस!"

"हम्म" माझ्या कानात मला माझ्याच हृदयाचे ठोके ऐकू येत होते, ही मुलगी, कशी आहे ना ही...फक्त चार दिवस झालेत आम्हाला भेटून, असे का वाटते की खूप आधीपासून ओळख आहे...ना देश सारखा, ना भाषा, कोणीच ओळखीचे मित्र मैत्रीण नाहीत, तरी अगदी आपलीशी वाटते...

ही मराठी-अमेरिकन आणि मी भारतातून आलेला बंगाली मुलगा...

शायो मला अशी भेटली, कॉलेजमध्ये, आमच्या ओरिएंटेशनच्या दिवशी...आणि त्या दिवसापासून आम्ही दोघेही एकत्र होस्टेलवर चालत जायला लागलो.

इतकी बडबडी आणि ठार वेडी मुलगी मला आधी कधीच भेटली नव्हती. हिला कविता आवडत होत्या, मात्र रबिन्द्रनाथ वाचले नव्हते, हिला जॅकारंडा माहित होता मात्र गुलमोहर नाही आणि ही दिसत भारतीय होती, मात्र डोक्याने १००% अमेरिकन! तरी ही छान होती! का कोणास ठाऊक, वाटलं अगदी माझ्यासाठी बनली होती...

**१६ जून २०१७ शायन्तिनीची डायरी**

"अभिनंदन, कॅन्सरमुक्त झाल्याबद्दल!" डॉक्टर अदितीच्या पातळ ओठातून ते शब्द बाहेर पडताना मला जणू दिसत होते. मी एक एक अक्षर अगदी लक्षपूर्वक ऐकत होते. माझ्या उजव्या हातातला दीपेनचा हात, त्याची पकड अलगद घट्ट झाली आणि पुन्हा सैलावली, दोघांना एकमेकांकडे न बघताच त्यातली ऊब, खात्री सगळेच जाणवले. घश्यातला आवंढा गिळत दोघेही कसनुसं हसत समोर बघत राहिलो, ह्या खोलीतल्या प्रत्येक पडद्याची चुणी जणू पाठ होती आम्हाला, प्रत्येक भिंत ओळखीची, इथला पांढरा रंग त्याला असलेली हिरवी झाक, अगदी परिचित, इतक्यांदा इथे आलो होतो. गेली पाच वर्षे मृत्यूशी चालेला हा शिवापाणीचा खेळ, सध्यापुरता तरी मी जिंकले होते. मरणाने धप्पा दिला होता आणि आता माझ्यावर राज्य आले होते. ओठ कोरडे ठक्क पडले होते, डोक्यावर टक्कल आणि सुया भोसकून भोसकून कोपरातल्या शिरा फुलारून आलेल्या. कोरड्या ओठावरून हलकेच जीभ फिरवत मी ओठांचे किनारे फाकवत स्मित करत उठले. हातात सगळ्या फाईली घेतल्या आणि डोळेभरून डॉक्टर अदितीकडे बघितले. तिचे निराळे आभार मानायची गरज उरलीच नव्हती. ह्या मनीचे गुज त्या मनी केव्हाच पोचले होते. आज खरेतर ती जिंकली होती, मी तिच्या मोठ्या युद्धातली एक लढाई होते फक्त, आमच्या दोघांसाठी मात्र तो समर प्रसंग होता. संपले रण...

त्या फिक्कट हिरव्या खोलीतून आम्ही दोघे बाहेर पडलो, पांढरे दार आमच्यामागे यंत्रवत बंद झाले.

दीपेनने हात लांब करून मला उभ्या उभ्या कडेने मिठी मारली. तितक्याशा जोराने माझ्या फासळ्या किंचित दबल्या. क्षीण हसत मी त्याच्या डोळ्यात बघत चालत राहिले, हॉस्पिटलची ही मोठी लॉबी, त्याचे भव्य काचेरी दरवाजे आमच्या येण्याने उघडले आणि मागोमाग मिटले. गाडीत जाऊन बसेपर्यंत आम्ही एकमेकांशी एक चकार शब्द बोललो नव्हतो. गाडीतला तो चिरपरिचित भीमसेनी कापराचा गंध दरवळला आणि दोघेही गाडीत बसून बेल्ट लावले, हातात हात घेऊन नुसते बसून राहिलो. हरी प्रसाद चौरासियांची बासरी आर्त काही आळवू लागली...बिहाग...त्यांच्या बोटांतून आमच्या ह्या कठीण काळाचा शेवट रेखाटत होते जणू...

मिटल्या डोळ्यातून अव्याहत अश्रू. दीपेनने अलगद धरलेला हात, प्रथमच लक्ष गेलं; त्याच्या मनगटावरचे केस करडे लाककले. हातावर सुरकुत्यांचे नवेच फराटे होते, त्याच ब्रशने डोळ्यांच्या कडांवर आणि दोन भुवयांमध्ये देखील तसलेच फराटे...कानावरले कल्ले सगळे पांढरे...हनुवटीच्या खाली, तीन एक बोटे, दोन आडव्या जाणाऱ्या खोल रेषा-सुरकुत्या तरी कसे म्हणावे...त्या चिरांमधून जणू त्याचे तारुण्य वाहून गेलेले. असह्यपणे मी मान वळवून खिडकीतून बाहेर बघत राहिले, इतर दूरवर लावलेल्या गाड्यांच्या काचांवरून सूर्याची किरणे अडखळत हळूहळू अस्ताकडे सरत होती. एखाद्या महाकाय रेशमी केशरी वस्त्रासारखा दिवस झरत होता...प्रत्येक सुरकुतीत प्रकाश गडद मिटत राहिला. संपला दिवस.

निःशब्द अंतर कापत आम्ही घरी पोचलो. २३०१ सिल्व्हर रिज ट्रेल, वेस्टलेक ओहिओ. ब्रॅडली रोड आला की अगदी घरी आल्यासारखं वाटतं, आज तर फ्रीवेवरून बाहेर पडता पडता वाटलं, आले घर. आलेच घर.

दार उघडून आत जाताच हातातल्या पिशव्या, फाईली सगळ्या जमिनीवर टाकत दीपेनने अक्षरशः उचलून घेतले मला, एक गिरकी घेत, अलगद खाली उतरवले. त्याच्या खांद्यावर हात ठेवत, आमची शरीरं अलगद घासत, माझे पाय जमिनीवर टेकले.

"वी डिड इट शाय...डिड इट" दोन्ही कानावर अलगद हात धरत, त्याचे ओठ माझ्या कपाळावर टेकले, त्याचे किंचित खरबरीत ओठ माझ्या कोमट कपाळावर हवेहवेसे ठसे उमटवत राहिले. डोळे बंद करून मी शांत उभी, अश्रू मास्कला चिकटून आत झिरपत राहिले.

"वी डिड इट दीप्स..."माझे देखील ओठ मास्कअडून पुटपुटत राहिले. माझे डोळे पुसत, दीपेन मला हात धरून सोफ्यापाशी घेऊन गेला, दोघेही बसलो तशी मी अलगद त्याच्यावर रेलून बसून राहिले.

"सो, मिस शायन्तिनी , व्हेर्स द पार्टी टुनाईट?" गालावरची खळी खोल करत दीपेनने विचारले.

"व्हेर बेटर दॅन युवर आर्म्स?" मी तिरकं बघत, त्याच्या खळीत तर्जनी टेकवत हसले...

"लेडी, लेडी, नॉट सो फास्ट..."

"व्हाय नॉट? टकल्या बाहुल्यांशी कधी खेळाला नाहीस की काय?" उगीच लाडिक सूर लावत मी समोर बघत राहिले.

"आज माझी डेट आहे, जगातल्या सर्वात शूर बाहुली सोबत! मेरी दुर्गा, मेरी माँ काली, मेरी शायो..."

मला अधिक जवळ ओढत आम्ही दोघे नुसतेच बसून राहिलो. दीपेनच्या खांद्यावर माझे डोके अगदी बरोबर बसे, अगदी दोन लेगोच्या तुकड्यांसारखे आम्ही सर्वार्थाने एकमेकांत अगदी मोजून मापून बसत असू, रात्री शेजारी शेजारी झोपून माझ्या देहाच्या इवल्याश्या " S " ला बाहेरून वेटोळे घालणारा दीपेनचा कॅपिटल "S". आत्ताही तसेच एकमेकांत अडकून सोफ्यावर बसलो होतो. त्याचा दंड घट्ट धरून शांत बसले होते, अचानक हनुवटीच्या किंचित वर हलकी ओळखीची थरथर उमटू लागली, खालचा ओठ हलके थरथरू लागला आणि डोळ्याच्या कडांवरून अनेक वर्षांचे जुनेच अश्रू वाहायला लागले. आयुष्याची, तारुण्याची पाच सुंदर वर्षे आम्ही ह्या रोगाशी लढण्यात घालवली होती...

निदान झाल्याझाल्या मी दीपेनला स्पष्टच सांगितलं, तुला हवे असल्यास मला सोडून दुसरे लग्न कर, ३८ म्हणजे फार वय नाही तुझे, तुला मुले होतील, छान आनंदात जगशील. दीपेन? तो कसला बधायला? 'घरच्यांशी भांडून तुझ्याशी लग्न केलं ते तुला अर्ध्यात सोडून द्यायला का?' एकाच प्रश्नाने त्याने सगळ्या शक्यता बाजूला सारल्या आणि कामाला लागला.

आधी खटाटोप करून नोकरी घरून करायची परवानगी मिळवली, मग राहत्या घराला विकून; नॉर्थ कॅरोलायना सोडून क्लिव्हलँड गाठलं, तिथे नवे घर घेतले आणि क्लिव्हलँड क्लिनिक मधल्या कर्करोग विभागात माझी सगळी ट्रीटमेंट सुरु केली. अगदी एखादे तान्हे बाळ जपावे तशी काळजी घेतली. माझे राग लोभ, अश्रू, मनस्ताप, आकांडतांडव सगळे निकराने सोसले. कमरेपर्यंतचे केस काही महिन्यात नाहीसे होऊ शकतात समजल्यावर केसांचे छान विग करून घेतले. माझा कृश देह मावेल छोटे, अधिक छोटे कपडे विकत आणत राहिला. तोंडाला चव यावी म्हणून शंभर एक सूपचे प्रकार करायला शिकला. त्याच्या छातीच्या उशीवर दिवस रात्र मला झोपू देत राहिला. स्वतःचे कधी, कसे काय बघितले त्यालाच ठाऊक.

निभले सारे, निभावले आम्ही.

"दीपेन, मला काहीतरी बदलायचे आहे. मला आता पेशन्ट म्हणून अजिबात वावरायचे नाही"

"कुठे फिरायला जाऊ या?"

"मला शिकायचं आहे..."

"काय?"

"मला जाहा हदीदच्या कॉलेजात जाऊन आर्किटेक्चर शिकायचं आहे..."

"ठरवलं कधी?"

"खूप आधी, इतकं सगळं विखरून गेल्यावर आता मला काही बांधायला शिकायचं आहे...प्लीज ना..."

हलक्या हाताने माझा मास्क काढत, कानाच्या पाळीमागे जो लालसर वर्ण उमटला होता, तो हलके पुसत, कुरवाळत तो नुसताच हसला... "मला एक सांग आवडत नाही का मी तुला? सतत कुठे ना कुठे पळून जायचा प्लॅन करत असतेस!"

"तसं कुठे? मला फक्त पेशन्ट म्हणून राहायचं नाही आहे, मला पुन्हा प्रॅक्टिस सुरु करता येणार नाही इतक्यात, म्हणून पुढे शिकावं..."

"म्हणून चक्क AA? लंडन?"

"तिथे कोणी ओळखत नाही मला, नवीन शायन्तिनी म्हणून जगता येईल पुन्हा..."

मला हलके बाजूला करत दीपेनने म्युझिक सिस्टम सुरु केली, पुन्हा कनिका बांधोपाध्याय...रोधनो भारा ए बसंत

परत माझ्यापाशी बसत, पुन्हा मला खांद्यावर रेलू देत, डोळे बंद करून बसला. दीपेन स्वतः एक उत्तम सॉफ्टवेर आर्किटेक्ट होता, माझ्या आजारपणात अर्धा डॉक्टर पण झालाच होता म्हणा...

**१६ जून २०५२ दीपेनच्या शेवटच्या डायरीतून**

"हैप्पी ऍनिव्हर्सरी शायो..."

तू नसलीस तरी तुझ्यावर प्रेम करत राहण्याचा हक्क माझाच राहील...फिफ्टी इयर्स, मी अखंड प्रेमात आहे तुझ्या, तुझ्या हसण्याच्या, रडण्याच्या, चित्रांच्या आणि तुझ्या डोळ्यांच्या प्रेमात! लंडनहुन आलीस तेच पुन्हा कॅन्सर घेऊन, माझ्यापेक्षा जास्त त्यानेच तुला साथ दिली ना...आपण खूप रडलो, लढलो आणि शेवटी कदाचित हरवलं आपण आपलेच प्राक्तन. १९ नोव्हेंबर २०३३, सोडून गेलीस तू, जगाला...मला नाहीच सोडलेस. मी देखील तुला नाहीच

सोडले कधी. चौरासियांच्या बासरीत तू भासतेस, रबिन्द्रसंगीतात तू असतेस, कादंबरी सिनेमातल्या परंबताच्या प्रेमात असलेली तू दिसतेस, बंगाली येत नाही म्हणत, शेवटी महाश्वेता देवीचा अरण्येर अधिकार वाचून काढणारी तू...ह्या घरातल्या प्रत्येक फोटोत रुतून बसलेली तू आणि बागेतल्या केळीच्या जुन्याच बुंध्यापाशी रुजलेली तू...

आपली गोष्ट अजिबात अर्धवट राहिली नाही शायो, आपण ती पूर्ण केली, अगदी पूर्ण...मुलं प्रेम पूर्ण करत नाहीत हे सिद्ध झाले, आई वडिलांचे छत्र प्रेम घडवत नाही हे सिद्ध झालं आणि लग्न प्रेम बांधून घालू शकत नाही हेही सिद्ध झालं...प्रेम करण्यातून प्रेम सिद्ध होतं, अखंड देण्यातून उमगतं आणि एकमेकांच्या दुःखांच्या दऱ्याखोऱ्यातून एकमेकांच्या हातात हात घालून चालताना सगळ्यात जास्त फुलतं. जसं आपलं फुललं प्रेम, विना पोरांचं आणि आता तुझ्या विना...

आय मिस अस शायो...

आय मिस यू...

**- प्राजक्ता पाडगांवकर,** कमिंग, जॉर्जिया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## संधी



काही दिवसांपूर्वी माझ्या बहिणीचा फोन आला तिला एका conference मध्ये एक session conduct करण्याचे निमंत्रण आले होते. त्या आनंदातच तिने ही बातमी मला फोन करून सांगितली. नकळत माझ्या तोंडून उद्गार निघाले, अगदी चांगली संधी चालून आली आहे. सुमारे 200 लोकांसमोर Seminar Session conduct करुन तिने त्या संधीचे सोने केले.

असा हा संधी शब्द म्हणताच आपल्याला ऐकायला मिळते, 'त्याने संधीचे सोने केले' , 'संधी कधी अगदी वेळेवर मिळाली', तसेच 'अरेरे, मिळालेली संधी गमावली' असे एक ना दोन बऱ्याच प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. तर ही संधी म्हणजे काय ? एखादी गोष्ट करण्यासाठीची अनुकूल परिस्थिती. अनुकूल परिस्थिती चा संयोग. गती किंवा यशासाठी चांगली स्थिती म्हणजे संधी किंवा संभावना. संधी म्हणजे, एक प्रसंग किंवा परिस्थिती ज्यामुळे तुम्हाला कळते की तुम्हाला काही करायचे आहे किंवा काहीतरी करण्याची शक्यता आहे.
संधी म्हणजे (सम् + धा + की) असे याचे व्याकरण म्हणजेच एकत्र करणे, एकत्र जोडणे. यावरून आपल्याला काय वाटते, आपल्याला काय करायचे असते आणि ते करण्यासाठी जो संयोग जुळून यावा असे वाटणे आणि तो जुळून येणे म्हणजेच संधी. मराठी व्याकरणानुसार संधी म्हणजे जोडणे, दोन शब्दांना जोडणे, उदाहरणार्थ, सम्+तोष = संतोष. संधी या शब्दाचा अर्थ 'संयोजन' किंवा एकीकरण असा होतो. दोन लगतच्या अक्षरांच्या परस्पर संयोगामुळे जो बदल होतो त्याला संधी म्हणतात.

अनेकदा अनपेक्षित ठिकाणांवरून संधी निर्माण होतात, त्यामुळे नवीन अनुभव आणि कल्पना तयार होतात. त्यावरुन तुम्हाला काय करायचे ते तुम्ही ओळखायचे असते. तुमच्या दारावर संधी येण्याची वाट पाहायची नसते. संधी व्यक्तींना नवीन अनुभव जाणून घेण्यात, नवीन कौशल्ये शिकण्यास आणि त्यांची क्षमता विकसित करण्यास अनुमती देते. ही एखाद्याला स्वत:च्या सुरक्षित कक्षेमधून बाहेर पडण्याची, आव्हानांना तोंड देण्याची आणि नवीन परिस्थितींशी जुळवून घेण्याची संधी देते. या अनुभवांद्वारे, वैयक्तिक वाढ आणि आत्म-शोध होतो.

संधी, ही नेहमीच आपल्या आसपासच असते. कधी कधी साक्षात समोर असते. फक्त त्याला समजणे अजमावणे हेच करायचे असते. जेव्हा आपण एखादी गोष्ट करण्याचे मनात योजतो, त्या दृष्टीने प्रयत्न करायला सुरवात करतो तेव्हा त्याबद्दलची संधी आपल्या समोर, आपल्या भोवतीच असते. फक्त त्याचे आकलन होणे बाकी असते. 'यत्र प्रतिभा अवसर प्राप्नोति:' ह्या वाक्यानुसार बुद्धी असणे, विषयाचे आकलन असणे, उत्सुकता असणे, हे असले की त्याबाबतच्या काही शक्यता आपोआपच आपल्या नजरेसमोर येतात. कधी कधी संधी इतकी दुर्मिळ होऊन जाते की म्हणावेसे वाटते, 'एक जीवनम्, एक: अवसर:'. जीवनात संधी एकदाच मिळते. आता हे जरी एखाद्या ब्रीदवाक्यासारखे असले तरी स्वतःच्या कर्तृत्वाने आपण परत तशीच संधी आपल्या समोर आणू शकतो. शेवटी संधी म्हणजे तरी काय? स्वतःच्या कर्तृत्वाच्या, ज्ञानाच्या बळावर परिस्थितीतल्या शक्यता बघण्याची दृष्टी, पुढे जाण्याची दृष्टी संधी उपलब्ध करुन देते. एखादे वेळी अपयश आले तर सर्वजण अपयश ही यशाची पहिली म्हणून खंर तर सांत्वतच करत असतात. तर जो हे अपयशाची बातमी मागे टाकून

परत झटतो तोच स्वत:लाच स्वतःसाठी परत नवीन संधी तयार करत असतो.

काही दिवसांपूर्वी एक पुस्तक वाचले 'Rebel Ideas: The Power of Diverse Thinking' , by Matthew Syed. लेखकाने 'Learning from Failure' चे अगदी यथार्थ वर्णन केले आहे, ज्यात main idea is Embracing failure as a learning tool. यासाठी लेखक Thomas Edison चे उदाहरण देतो, 'The story of Thomas Edison, who viewed his numerous failed attempts at creating the lightbulb as necessary steps toward eventual success'. ह्या सगळ्याला सकारत्मक दृष्टीकोन, open mind  हेच कामी येते. तयारी आणि संधी ही यशस्वी पणाची पहिली पायरी. जेव्हा संधीचा योग्य फायदा घेतला जातो तेव्हा जीवन आमुलाग्र पद्धतीने बदलून जाते. संधी, शक्यता म्हणजे नशीब नाहीतर ती जेव्हा येते, दार ठोठावते तेव्हा दार उघडायला पाहिजे याची जाणीव व्हायला पाहीजे. अशी ही मोलाची संधी, भाग्याची संधी, जी स्वत:च ओळखायची असते स्वतःसाठीच. आयुष्यातल्या संधीला ओळखायला शिकले पाहिजे, म्हणजे एखादी गोष्ट आपल्या आवाक्यात असेल  तर त्याचा फायदा करूनच घेतला पाहिजे आणि फक्त नशीबावर अवलंबून राहणे हे उत्तर नाही. एडीसन ने स्वतःसाठीची संधी स्वतःच निर्माण केली होती. म्हणजे स्वयंप्रेरीत संधी निर्माण केली होती आणि स्वतःच्या ज्ञानावर त्याचे सोने पण केले होते.

काही काही लोकांसाठी संधी समोर असून काही अपहार्य कारणाने, नाइलाजाने संधीवर पाणी सोडावे लागते, पण त्यांना त्या संधीचे मोल कळाले असते म्हणूनच ते तशीच संधी दुसऱ्यांच्या पुढे आणून ठेवतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझी आई. तिला मॅट्रीक झाल्यावर MA पर्यतची स्कॉलरशीप मिळली होती पण काही अपहार्य कारणाने तिला तिचे शिक्षण पुढे पूर्ण करता आले नाही.

पण शिक्षणाचे महत्त्व कळून पूढे आयुष्यात तिने गरजू मुलींना शिक्षण उपलब्ध करून दिले, काहींना पैशाने मदत, तर काहींना सल्ल्याने मदत. नंतर अश्या संधी बाकीच्यांसाठी उपलब्ध करून दिल्या आणि त्याची कधी वाच्यताहि  केली नाही. पुढे तिच्या पश्चात याच मुली आम्हाला भेटायला आल्या आणि आमच्याच आईच्या आठवणी, तिने केलेल्या मदती बद्दल सांगत राहिल्या.

शेवटी संधी ही जशी स्वतःसाठी महत्त्वाची त्यापेक्षा दुसऱ्यांसाठी उपलब्ध करून देऊन त्या संधीचे महत्त्व व्दिगुणित करणारी.

संधी हा एक शब्द पण किती कंगोरे त्याला, समोर आलेली संधी ओळखणे, तसेच दुसऱ्यांसाठी संधी उपलब्ध करून देणे, स्वयंप्रेरीत संधी स्वत:साठीच तयार करणे. तसेच, जशी ती मिळते तशी कधी नकळत निसटून पण जाते. पण निसटण्याची कशाला गोष्ट करायची. सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन मिळालेल्या संधीचा योग्य विनीयोगच घेतला जाईल असे बघू.

बदलू विचारांची दिशा
नवा विचार नवा आचार
निर्माण करू नव्या शक्यता
निर्माण करू नव्या वाटा
हीच तर असते संधी
तुमच्यासाठीही नी आमच्यासाठीही

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा -फ्लोरिडा

## प्रेम

प्रेम असतं गाणं
दोघांच्या मनात !
प्रेम असतं भिजणं
चिंब पावसात !!
प्रेम असतं नाचणं
आनंदाच्या भरात !
प्रेम असतं जगणं
भान विसरून जीवनात !!
प्रेम असतं चांदणं
पडलेलं अंगणात !
प्रेम असतं मोहरणं
मोगऱ्याच्या सुगंधात !!
प्रेम असतं फिरणं
मोहरलेल्या चैत्रबनात !
प्रेम असतं बहरणं
शिशिरानंतरच्या वसंतात !!

- **योगेश पुराणिक,** रॉकी हिल, कनेक्टिकट

## बीएमएम फायनान्शियल अवलोकन - २०२४

- आधीची समिती न्यूयॉर्कमधील अकाउंटिंग फर्मकडे बँक स्टेटमेंट सादर करत होती आणि ते प्रविष्ट करत असलेला डेटा क्विक बुक्सच्या माध्यमातून बीएमएम उपक्रमाचा मागोवा घेण्यास सक्षम नसे. अकाऊंटिंग फर्म कधीही क्विकबुक्स (क्यूबी) पूर्ण ऍक्सेस देत नव्हती. त्या कामामुळे समितीसाठी बरीच मॅन्युअल कामे तयार होत होती.
- माझ्या मोहिमेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार खालीलप्रमाणे वित्तीय लेखा प्रक्रियेत ऑटोमेशन यशस्वीरित्या कार्यान्वित केले:
    - पैशांचा प्रवाह समजून घेण्यासाठी मागील 2 वर्षांच्या डेटाची तुलना केली. 12/31/2023 रोजी लेखापालांकडून क्यूबी फाईल घेतली. आमच्या उपक्रमांनुसार विविध वर्ग तयार करण्यासाठी क्यूबी कॉन्फिगर करावे लागले. क्यूबीमध्ये 12 महिन्यांचा आर्थिक डेटा प्रविष्ट केला आणि समायोजित केला. उपक्रमानुसार अहवाल तयार केले.

**सन २०२४ चा नफा-तोटा खालीलप्रमाणे आहे.**

4:48 PM
01/27/25
Accrual Basis

**BMM NORTH AMERICA INC**
**Balance Sheet**
As of December 31, 2024

| | Dec 31, 24 |
|---|---|
| ASSETS | |
| Current Assets | |
| Checking/Savings | |
| BANK OF AMERICA - SAVING # 5826 | 50,036.07 |
| BANK OF AMERICA # 5267 | 100.00 |
| BANK OF AMERICA CHK - # 4341 | 38,110.30 |
| PAYPAL | 6,220.14 |
| Zeffy US | 550.00 |
| Total Checking/Savings | 95,016.51 |
| Other Current Assets | |
| COMMONWEALTH FINANCIAL NETWORK | 862,742.64 |
| Total Other Current Assets | 862,742.64 |
| Total Current Assets | 957,759.15 |
| Other Assets | |
| SEED MONEY SEATTLE | 20,000.00 |
| SF SEED MONEY RECEIVABLE | 15,000.00 |
| Total Other Assets | 35,000.00 |
| TOTAL ASSETS | **992,759.15** |
| LIABILITIES & EQUITY | |
| Equity | |
| GENERAL FUND | 222,245.80 |
| Opening Bal Equity | 8,370.17 |
| Retained Earnings | 585,777.91 |
| Net Income | 176,365.27 |
| Total Equity | 992,759.15 |
| TOTAL LIABILITIES & EQUITY | **992,759.15** |

Note: The Market Value of the investments at Commonwealth Financial Network is $862,742.64 with an unrealized Gain of $159,995.61 as of 12/31/2024

4:49 PM
01/27/25
Accrual Basis

## BMM NORTH AMERICA INC
## Profit & Loss
January through December 2024

| | | Jan - Dec 24 |
|---|---|---|
| Ordinary Income/Expense | | |
| Income | | |
| BMM CONVENTION SURPLUS | | 1,500.00 |
| BMM Courses & Initiatives | | |
| Astrology Course | 1,500.00 | |
| Total BMM Courses & Initiatives | | 1,500.00 |
| CONVENTION REVENUE | | 10,258.00 |
| DONATION | | 505.00 |
| INDIA PROGRAMMING | | 3,130.00 |
| INTEREST INCOME | | 2,898.40 |
| MAITRI MELAWA | | 1,899.58 |
| MARATHI MOVIE | | 11,781.44 |
| MARATHI SHALA EXAM FEES & BOOKS | | 45,208.25 |
| Membership | | 6,802.00 |
| PAUROHITYA | | 13,338.87 |
| Reshimgathee | | 20,740.00 |
| RETURNS & ALLOWANCES | | 81.77 |
| SUSPENSES - INCOME | | 0.00 |
| VRUTTA | | |
| DONATION | 450.00 | |
| NEWS LETTER-ADV | 1,490.00 | |
| VRUTTA MEMBERSHIP | 2,650.00 | |
| Total VRUTTA | | 4,590.00 |
| Total Income | | 124,233.31 |
| Expense | | |
| BANK SERVICE CHARGES | | 1,053.31 |
| BHARATI VIDYAPITH PUNE FEES EXP | | 550.00 |
| COMPUTER EXPENSES | | 565.01 |
| CONVENTION RELATED | | 12,428.51 |
| Donation Exp | | 5,000.00 |
| DUES AND SUBSCRIPTION | | 2,978.78 |
| EDUCATION ENDOWMENT | | 16,002.00 |
| INDIA PROGRAMMING EXPS | | 4,636.33 |
| INSURANCE | | 1,530.00 |
| MARATHI MOVIE EXPENSE | | 1,400.00 |
| MARATHI SHALA EXPS | | 16,377.02 |
| NEWS LETTER PRINTING | | 4,326.20 |
| PAUROHITYA EXP | | 15,056.26 |
| PROFESSIONAL FEES | | |
| Legal Fees | 5,440.00 | |
| Total PROFESSIONAL FEES | | 5,440.00 |
| PROGRAM EXPENSE | | 6,135.60 |
| Reimbursed Expenses | | 146.19 |
| SF BMM Exp | | 11,808.44 |
| TRAVEL EXPS | | 422.32 |
| VRUTTA PRINTING | | 81.77 |
| Total Expense | | 105,937.74 |
| Net Ordinary Income | | 18,295.57 |
| Other Income/Expense | | |
| Other Income | | |
| Other Income | | 1,352.00 |
| Unrealized Capital Gain /(LOSS) | | 159,995.61 |
| Total Other Income | | 161,347.61 |

| | Jan - Dec 24 |
|---|---|
| Other Expense | |
| OTHER EXPENSE | 3,277.91 |
| Total Other Expense | 3,277.91 |
| Net Other Income | 158,069.70 |
| Net Income | 176,365.27 |

**- Santosh Salvi, BMM Treasurer**

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Peaceful Mandala***

**Artist: Priya Kulkarni - Moghe**

Dimension: 14 x14″ circular disc
Medium:Mix Media
Price : Not for sale. (But I take orders for such beautiful artworks. Designs and colors may vary.)



***Winter in my Neighborhood***

**Artist: Medha Atre - Kulkarni**

Dimension: 8″x 10″
Medium:Watercolor
Price :$200
Mandal:Marathi Vishwa, NJ



***Dancing Among the Blossoms***

**Artist: Chaitali Nadkarni**


Dimensions: 9″ x 12″
Medium: Oil on canvas
Price: $250



***What about me?***

**Artist: Avi Sadhu**


Dimensions:17″x22″
Medium: Watercolor
Price: Price is negotiable
Mandal: MMLA



***Timeless Tones: The Spirit of Autumn***

**Artist: Kirti Tannu**

Dimensions: 18″ x 24″
Medium: Watercolor
Price: $235
Mandal: MM Milwaukee



***Autumn***

**Artist: Chitra Juvekar - Mehendale**

Dimensions:12″ x 16″
Medium: Oil Paint
Price:Not for Sale
Mandal: Seattle MM

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.